दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ मंगळवार, दि.११ फेब्रुवारी २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १३० ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

घाटकोपरमध्ये प्रथमच साई उत्सवात अश्व रिंगणाचा दिमाखदार सोहळा संपन्न

मुंबई : घाटकोपरमधील जांभळीपाडा येथील कैलास बाल मित्र मंडळातर्फे १६ व्या साई उत्सव वर्धापन दिनाच्या औचित्याने ७ ते ९ फेब्रुवारी असा तीन दिवसीय सोहळा नुकताच पार पडला. 'शिर्डी माझे पंढरपूर' या संकल्पनेवर आधारीत प्रवेशद्वारावरील नयनरम्य सजावट नागरीकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती. ज्यात विठ्ठल रखुमाईची प्रतिकृती, ज्ञानेश्वर माऊलींनी रेड्यामुखी वेद वदविले ह्या दृष्याचा सुंदर देखावा साकारण्यात आला होता. यंदाच्या उत्सवात साई सच्चरित्र पारायण, महिलांचा हळदी-कुंकू समारंभ, गजर साईनामाचा भजन कार्यक्रम, जागरण-गोंधळ, आरोग्य तपासणी शिबीर, भव्य पालखी मिरवणूक सोहळा, महाप्रसाद असे विविध कार्यक्रम पार पडले. भव्य पालखी मिरवणूकीत घाटकोपरमध्ये प्रथमच वर्षानुवर्षे पंढरीच्या वारीत जसा रिंगण सोहळा पार पडतो अगदी तसाच शेकडो वारकरी, टाळकरी, मृदुंगवादक आणि साईभक्तांच्या उपस्थितीत अश्व रिंगणाचा दिमाखदार सोहळा संपन्न झाला ज्याची सर्वत्र चर्चा झाली.

योग्य नियोजनासह सकारात्मकतेने परीक्षांना सामोरे जा: प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

वृत्तसंस्था ■ मुंबई





मंत्री ?ड. आशिष शेलार यांच्यासह विविध शाळांमधील विद्यार्थी उपस्थित होते.

मुंबई : जीवनात स्वतःशी स्पर्धा ठेवून प्रत्येक क्षण सकारात्मकतेने जगा. आत्मविश्वास वाढण्यासाठी वेळेचे योग्य नियोजन करा, उद्दिष्टांचे लहान लहान टप्पे करुन ते पूर्ण केल्याचा क्षण साजरा करा. तसेच परीक्षांचा ताण न घेता अभ्यासावर लक्ष केंद्रित करा, त्यातून नक्की यश मिळेल, असा सल्ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी नवी दिल्ली येथे शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाच्या मुंबईत शिवाजी पार्क येथील स्काऊट आणि गाईडच्या सभागृहात झालेल्या प्रसारण कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य

प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा हेच अंतिम ध्येय न ठेवता सर्वांगीण ज्ञान मिळविण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करावा. स्वतःला ओळखून वर्तमानातील प्रत्येक क्षण उत्तम पद्धतीने जगावा. लिहिण्याच्या सवयीतून आपले मत व्यक्त होत असते.

अपयश हे जीवनात यशस्वी होण्यासाठीचे इंधन असते, असे सांगून प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी विद्यार्थ्यांना अपयशाची भीती न बाळगता त्याला आपला गुरू बनविण्याचा सल्ला दिला. एकाग्रतेसाठी ध्यान धारणेला महत्त्व असल्याचे सांगून निसर्ग, संतूलित आहार, नवनवीन तंत्रज्ञान, नेतृत्व करताना टीम वर्क आदी बाबींचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी निसर्गाची काळजी घेण्याचे आवाहन करून त्यांनी विद्यार्थ्यांना 'एक पेड मा के नाम' अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. पालकांनी विद्यार्थ्यांमधील क्षमता, त्यांच्या इच्छा ओळखावी आणि त्यांना प्रोत्साहन देऊन मदत करावी, असे आवाहन त्यांनी पालकांना केले.

यशासाठी मनातील भीतीवर विजय मिळवा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आव्हाने ही सर्वांसमोर असतात. सकारात्मकतेने त्यावर मात करावी, विद्यार्थ्यांनी इतरांशी स्पर्धा न करता स्वतःशी स्पर्धा करावी आणि मनातील भीतीवर विजय मिळवावा. सरावाने सामान्य माणूस देखील असामान्य काम करून असामान्य बनू शकतो, यामुळे प्रधानमंत्री यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार स्वतःला ओळखून स्वतःमधील क्षमता वाढविण्याचा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दिला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, केवळ परीक्षा हेच अंतिम उद्दिष्ट नसून विद्यार्थ्यांनी जीवनातील आव्हानांशी कसा सामना करावा यादृष्टीने प्रधानमंत्र्यांशी झालेला संवाद हा अतिशय उपयुक्त आहे. प्रधानमंत्री अतिशय संघर्षमय जीवनातून यशस्वी झाले असून त्यांनी जगात भारताची नवी ओळख तयार केली आहे. या अनुभवातून विद्यार्थ्यांना जीवनाचे ज्ञान मिळावे, हा या कार्यक्रमाचा हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एसएनडीटी महाविद्यालयाच्या डॉ.अदिती सावंत यांच्या कॉटन या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

'मुंबई भारताची 'कन्व्हेन्शन कॅपिटल'- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : मुंबई ही भारताची 'कन्व्हेन्शन कॅपिटल' म्हणून उदयास येत आहे. बांद्रा परिसरात 'ताज' ग्रुपच्या नव्या आणि अत्याधुनिक हॉटेलमधील आधुनिक कन्व्हेन्शन सेंटरमुळे मुंबईतील व्यावसायिक संधी अधिक वाढतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

'ताज' ग्रुपच्या बांद्रा परिसरातील नव्या आणि अत्याधुनिक हॉटेलचे भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, माजी मंत्री दीपक केसरकर ,इंडियन हॉटेल्सचे सीईओ पुनीत चटवाल तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईच्या सौंदर्यात भर घालणारे, पर्यटन तसेच व्यावसायिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठरणारे हे हॉटेल भविष्यात मुंबईची एक नवी ओळख निर्माण करेल. टाटा समूह आणि विशेषतः ताज हॉटेल्सचा भारताच्या विकासात मोठा वाटा आहे. 'ताज हे केवळ एक हॉटेल नसून, प्रत्येक भारतीयाचा अभिमान आहे,' '२० व्या शतकातील कुलाब्यातील ताजप्रमाणे, २१ व्या शतकातील हे हॉटेल नवे प्रतिक ठरेल,' असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. मुंबईत

ताज समुहाच्या नव्या ताज बॅण्डस्टॅण्ड हॉटेलचे भूमिपूजन

आणखी नव्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुविधा असलेल्या हॉटेल्सची गरज असून, ही संधी हेरून या क्षेत्रातील कंपन्यांनी नव्या प्रकल्पांची उभारणी करावी, असे आवाहनही श्री. फडणवीस यांनी केले.

या संपूर्ण प्रक्रियेत मुंबई महानगरपालिका वेगवान निर्णयात सकारात्मक असेल. अशा प्रकल्पांच्या उभारणीमध्ये कुठलाही अडथळा येणार नाही. प्रशासन ही केवळ नियामक संस्था नसून, विकासातील भागीदार आहे,' असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

या संपूर्ण प्रकल्पामागे टाटा समूहाचे मार्गदर्शक, अध्वर्यू दिवंगत रतन टाटा यांचे महत्त्वाचे योगदान असून रतन टाटा यांचे हे स्वप्न या निमित्ताने पूर्ण होईल. या सोहळ्याच्या माध्यमातून मुंबईच्या पर्यटन आणि व्यावसायिक प्रगतीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे, असा विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी इंडियन हॉटेल्स आणि टाटा समूहाचे अभिनंदन केले. नागपूरमध्येही अत्याधुनिक सुविधांसह हॉटेल उभारण्याचा टाटा ग्रुपचा विचार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी मनोगत व्यक्त केले. तर इंडियन हॉटेल्सचे सीईओ पुनीत चटवाल यांनी प्रास्ताविक केले.

मत्स्य उत्पादन वाढीच्या दृष्टीने तलावांच्या 'डीजिटलायझेशन'ची प्रक्रिया तातडीने सुरू करावी : मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्यातील गोड्या पाण्याची मासळीचे उत्पादन वाढवणे आणि मच्छिमारांचा आर्थिकस्तर उंचावणे महत्वाचे आहे. त्यासाठी राज्यातील मासेमारी तलावांचे 'डीजिटलायझेशन' महत्वाचे आहे. ही प्रक्रिया तातडीने सुरू करावी असे आदेश मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालयात राज्यातील तलावांचे ठेके आणि मत्स्य उत्पादन वाढीबाबत झालेल्या बैठकीमध्ये मंत्री श्री. राणे यांनी या सूचना दिल्या. यावेळी मत्स्य आयुक्त किशोर तावडे, मत्स्य उद्योग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अनिता मेश्राम, मत्स्य व्यवसाय विभागाचे सह आयुक्त अभय देशपांडे, संदीप दफ्तरदार, उप आयुक्त ऋता दीक्षित आदी उपस्थित होते.

राज्यातील गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन वाढीसाठी या व्यवसायामध्ये सुसूत्रता आणणे गरजेचे असल्याचे सांगून मंत्री श्री. राणे म्हणाले की, या व्यवसायमध्ये सध्या कोणत्याही प्रकारची माहिती विभागाकडे उपलब्ध होत नाही. व्यवसायामध्ये पारदर्शकता आणणेही महत्वाचे आहे. यासाठी या व्यवसायाचे 'डीजिटललायझेशन' होणे गरजेचे आहे. तलावाचा ठेका कोणाला दिला, किती कालावधीसाठी दिला, कशा स्वरुपाचा होता, उत्पादन किती तसेच मासेमारी व्यवसाय कराणारे, मासळी विक्रेते, मासळी वाहतूकदार यांची माहिती, या सर्व बाबींची माहिती एका क्लिकवर उपलब्ध असली पाहीजे. यासाठी राज्यभर मोहिम स्वरुपात 'डीजिटललायझेशन' करण्याची प्रक्रिया राबवावी. हे 'डीजिटललायझेशन' कशा प्रकारे करता येईल यासाठी विभागाने आराखडा तयार करावा. त्यासाठी एक एजन्सी नेमावी. नेमण्यात येणाऱ्या एजन्सीला या कामातील चांगला अनुभव असावा. तसेच गुगल मॅपिंगच्या धर्तीवर नकाशे मागवावेत, त्यांचे वर्गीकरण करावे, असे आदेशही मंत्री श्री. राणे यांनी दिले.

मंत्री श्री. राणे म्हणाले की, तलावांमधील गाळ काढणे आणि तलावांवर असलेले अतिक्रमण यांचीही माहिती विभागाने तयार करावी. ही माहिती तयार करताना टप्पा टप्प्याने अतिक्रमण काढणे आणि राज्यभर मत्स्य व्यवसायाचे अधुनिकीकरण कशा प्रकारे करता येईल याचाही कृती आराखडा तातडीने तयार करावा. विभागाला सक्षम करण्यासाठी 'डीजिटललायझेशन' सोबतच अधुनिकीकरण आणि व्यवसायामध्ये पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. अधुनिकीकरणासाठी संस्था, तज्ज्ञ, अभ्यासक यांच्याकडून अभिप्राय मागवावेत. सध्या सुरू असलेली प्रक्रिया सुरळीत सुरू ठेवावी. तलावांमधील गाळ काढण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी जलसंपदा विभागाशी चर्चा करून कार्यवाही सुरू करावी. गाळ काढणे आणि अतिक्रमण हटवणे यासाठी विभागवार कृती आराखडा तयार करावा. तसेच तलाव ठेक्यातील अटींचे पालन होत आहे किंवा नाही याची माहिती घेण्यासाठी एक सक्षम यंत्रणा विभागाने उभी करावी. पहिल्या टप्प्यात तलावांचे 'डीजिटललायझेशन' करून त्यानंतर अधुनिकीकरण करायचे आहे. तसेच तलाव ठेक्यांसाठी किमान शुल्क आकारणी, स्पर्धात्मकता आणणे अशा पद्धतीने काम करावयाचे असल्याचे मंत्री श्री. राणे यांनी सांगितले.

राज्यात सध्या ५०० हेक्टर पेक्षा कमी आकाराचे २ हजार ४१० तलाव आहेत. तर ५०० ते १००० हेक्टरचे ४१ आणि १००० हेक्टर पेक्षा मोठ्या आकाराचे ४७ तलाव आहेत. तलावांचे अ, ब आणि क वर्ग असे वर्गीकरण करण्यात येत आहे. मासळीचा किमान दर ठरवण्याची प्रक्रिया नव्याने करण्यात येत असल्याची माहिती मत्स्य व्यवसाय आयुक्त श्री. तावडे यांनी दिली. तसेच संगणकीकरण, अधुनिकीकरण या माध्यमातून गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन वाढीसाठी घ्यावयाच्या निर्णयांची माहिती विभागाने दिली.

हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीमेचा राज्यातील ५ जिल्ह्यांत १० फेब्रुवारीपासून शुभारंभ

हत्तीरोगग्रस्त नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन - आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या निमित्ताने येत्या आज १० फेब्रुवारीपासून राज्यातील ५ जिल्ह्यांत हत्तीरोग दुरिकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबविण्यात येणार आहे. या राष्ट्रीयस्तरावर राबविण्यात येणाऱ्या मोहिमेचा शुभारंभ केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते झाला असून, राज्य स्तरावर सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या मोहिमेला सुरुवात झाली आहे.

राज्यातील पाच जिल्ह्यांत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत हत्तीरोगग्रस्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या निमित्ताने १० फेब्रुवारीपासून १३ राज्यांतील १११ जिल्ह्यांमध्ये हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबविण्यात येणार आहे. राज्यातील पालघर, नांदेड, गडचिरोली, भंडारा व चंद्रपूर या ५ जिल्ह्यांतील ३४ तालुक्यांमध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या पाच जिल्ह्यांमध्ये मिळून एकूण ५४ लाख ९८ हजार ८८४ लोकसंख्या असून त्यापैकी ५१ लाख ५८ हजार १७० पात्र लाभार्थ्यांना औषधे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या मोहिमेंतर्गत उपचारासाठी डीईसी, अल्बेंडाझोल आणि आयवरमेक्टिन या औषधांचा वापर करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने २०२७ पर्यंत या आजाराचे देशातून दुरीकरण करण्याचे ध्येय ठेवले आहे.

देशात २० राज्यांतील ३४८ जिल्ह्यांमध्ये हत्तीरोग (लिम्फ्याटिक फायलेरियासिस) या आजाराचे रुग्ण आढळून आले होते. परंतु जागतिक आरोग्य संघटना आणि केंद्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने देशामध्ये १९५७ पासून विविध जिल्ह्यांमध्ये ही मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या यशामुळे हत्तीरोग या आजाराचे ७ राज्यांतून दुरीकरण शक्य झाले आहे. हत्तीरोग हा दुर्लभ आजार आहे. दूषित क्युलेक्स डासांच्या चाव्यामुळे हा आजार होतो. याचे प्रदूषित पाण्यात प्रजनन होते.

छत्रपती संभाजी नगर मधील जलजीवन मिशन अंतर्गत प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा : पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : जल जीवन मिशन अंतर्गत छत्रपती संभाजीनगरमधील जीवन प्राधिकरण अंतर्गत एकूण ११६४ योजनांची कामे जलदगतीने पूर्ण करण्यासंदर्भातील कार्यवाहीचा आढावा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी घेतला. नळपाणी पुरवठा अंतर्गत १०० टक्के नळ जोडणी पूर्ण झालेल्या ७१७ योजना असून, उर्वरित ४४० कामे पूर्ण करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले.

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत योजनांची आर्थिक आणि भौतिक प्रगती, सिल्लोड, गंगापूर-वैजापूर ग्रीड, देवगाव, पिशोर, लाडसावंगी, केळगाव, चारनेर, शिरसाळा, ३५ गावे औरंगाबाद, रेल कनकावतीनगर पाणी पुरवठा योजनांची सद्यःस्थिती, कामे पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या समस्या, १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत पूर्ण करण्यात येणाऱ्या कामांचा मंत्री श्री. पाटील यांनी आज मंत्रालयातील दालनात आढावा घेतला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात नळ जोडणी अंतर्गत ७१८ गावांत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत नळ जोडणीच्या १४ च्या राबविण्यात येत आहे. यामध्ये १४ लाख २२ हजार ६५१ लोकसंख्येत २ लाख ८५ हजार ९८ घरे आहेत. २ लाख २६ हजार ६५४ नळ जोडणी पूर्ण केली असून, दोन लाख ३७ हजार ११५ नळ जोडणी १०० दिवस कार्यक्रमाअंतर्गत साध्य करण्यात येणार आहे.

या बैठकीस विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, विशेष कार्यकारी अधिकारी प्रशांत भांबरे, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी (दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.) जल जिवन मिशनचे अभियान संचालक इ. रविंद्रन, मुख्य अभियंता मनिषा पलांडे, कार्यकारी अभियंता दी. ह. कोळी, अजित वाघमारे, वरिष्ठ भूवैज्ञानिक जीवन बेडवाल यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

समाजात प्रेम, शांतता व सद्भावना निर्माण करण्याचे ब्रह्मकुमारींचे कार्य प्रशंसनीय : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : एकीकडे मनुष्य विज्ञान - तंत्रज्ञान, उद्योग व व्यवसायात प्रगती करीत असताना दुसरीकडे तो वैयक्तिक व भावनिक स्तरावर अशांत होत आहे. अशावेळी ब्रह्मकुमारी संस्थेच्या भगिनींचे समाजात प्रेमभावना, शांतता व सद्भावना निर्माणाचे कार्य अतिशय प्रशंसनीय आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केले.

'वैश्विक संस्कृती, प्रेम, शांतता व सद्भावना' या ब्रह्मकुमारी संस्थेच्या कला व सांस्कृतिक विभागाच्या जागतिक अभियानाचे राज्यातील उद्घाटन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज राजभवन मुंबई येथे संपन्न झाले, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

कला आणि कलाकारांच्या माध्यमातून तरुण पिढीला भारताच्या संस्कृती आणि सनातन मूल्यांशी जोडणे हा सदर अभियानाचा उद्देश आहे. कार्यक्रमाला चित्रपट सृष्टीतील अनेक कलाकार उपस्थित होते.

स्वतःसाठी जगणे चुकीचे नाही. परंतु केवळ स्वतःसाठी जगणे चुकीचे असल्याचे सांगताना ब्रह्मकुमारी संस्था ध्यान व राजयोग यांच्या माध्यमातून प्रेम व शांतता या प्राचीन मूल्यांना नव्या पिढीपुढे आणण्याचे कार्य करीत असल्याबद्दल राज्यपालांनी आनंद व्यक्त केला.

आज मुक्त व्यापारामुळे जग लहान गाव झाले आहे. व्यापार वाढला आहे, त्यातून ग्राहकाचा फायदा होत आहे. परंतु अनेक क्षेत्रात जीवघेणी स्पर्धा वाढली आहे. स्वतःला ओळखून

संस्कृती, प्रेम, शांती व सद्भावना राज्य अभियानाचे राज्यपालांच्या हस्ते उद्घाटन

इतरांसाठी कार्य करीत नाही तोवर मनुष्य जीवन अपूर्ण असल्याचे राज्यपालांनी नमूद केले.

आज जीवन खूप गतिमान झाले आहे. अशावेळी ध्यानाच्या माध्यमातून चित्त स्थिर करता येते व सकारात्मक विचार अंगीकारता येतात, असे त्यांनी सांगितले.

जीवनात सत्ता आणि पैसा या गोष्टी देखील महत्वाच्या आहे परंतु त्याचा उपयोग इतरांच्या सेवेसाठी झाला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. सर्वांनी एकत्रित काम करून देशाला बलशाली केले पाहिजे. देश बलशाली झाल्यानंतर प्रेम व सद्भावनेचा विचार जगाला दिल्यास त्याला लोक महत्व देतील असे राज्यपालांनी सांगितले.

कलाकारांच्या जीवनात प्रेम, शांती व सद्भावना महत्वाची : पूनम ढिल्लन

चित्रपट सृष्टी ही इतरांना आनंद देण्यासाठी व मनोरंजन करण्यासाठी निर्माण झाली असली तरी देखील प्रत्येक कलाकाराला स्वतःच्या समस्या असतात. त्यामुळे कलाकारांना आत्मिक शांतीसाठी प्रेम, शांतता व सद्भावनेची विशेष गरज असल्याचे अभिनेत्री पूनम ढिल्लन यांनी यावेळी सांगितले. जीवनात इतरांशी तुलना नको कारण प्रत्येक जण अद्वितीय असतो असे त्यांनी सांगितले.

जीएसटी अभय योजनेचा लाभ घ्या: विनोद गवई

प्रतिनिधी ■ वर्धा



वर्धा, दि. १० (जिमाका) : जीएसटी लागू होऊन सात वर्ष झाली आहेत. करदात्यांना कर भरणा करण्यास सुलभता व्हावी, याकरिता जीएसटी अभय योजना-२०२४ राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत ज्या करदात्यांकडे वित्तीय वर्ष २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० मधील जीएसटीचे प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यांनी कराचा भरणा केल्यास त्यावर लागणारे व्याज व दंड माफ करण्यात येणार आहे. त्यामुळे कर प्रलंबित असणाऱ्या करदात्यांनी जीएसटी अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन राज्यकर सहआयुक्त विनोद गवई यांनी केले आहे.

नुकतीच जीएसटी भवन येथे अभय योजनेबद्दल माहिती देण्यासाठी राज्यकर सहआयुक्त विनोद गवई यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी टॅक्स बार असोशिएशनचे ?ड विशाल धीरन, ?ड कमल क्रिपलानी, ?ड सुनिल फत्तेपुरिया, सी.ए. दीपक मुंदडा, कुलशेखर जाजोदीया, मनोज पत्की, पंकज पटेल, विपुल पंचासरा, गणेश चौधरी आदी उपस्थित होते.

या कार्यशाळेत उपस्थितांच्या शंकांचे निराकरण करण्यात आले. तसेच अभय योजनेबद्दल सहाय्यक राज्यकर आयुक्त श्री. डुंमरे यांनी पीपीटीद्वारे सादरीकरण करुन माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन राज्यकर अधिकारी श्रीमती सीमा राजेश पाटील केले तर उपस्थितांचे आभार राज्यकर निरीक्षक संदीप शेंद्रे यांनी मानले.

संपादकीय...

'डंकी' डंख!...

अमेरिकेतून कधीही पाठवणी होऊ शकते याची कल्पना असतानाही जोखीम पत्करली जाते, यावरून मायभूमीकडून त्यांना किती अपेक्षा उरल्या आहेत, याचा अंदाज बांधता येतो.सारे काही कुर्बान करून अमेरिकेची वाट धरलेली बरी, असा विचार करणारे या देशात असंख्य आढळतात हा धोरणकर्त्यांचा पराभव ठरतो.अमेरिकेतून हाता-पायाला बेड्या घालून, लष्करी विमानात अवमानास्पदरीत्या ढकलून, चार ठिकाणी थांबत ४० तासांच्या डांबलेल्या प्रवासानंतर १०४ थकलेले आणि हरलेले भारतीय जीव दिल्लीत कसे उतरतील, याची चिंता वाटल्यामुळेच बहुधा त्यांना अमृतसरमध्ये उतरवण्याचा निर्णय केंद्र सरकारकडून झाला असावा. बेकायदा स्थलांतरितांची पाठवणी करताना बेड्या ठोकणे हा अमेरिकेच्या स्थलांतरित विभागाच्या नित्य कार्यवाही प्रक्रियेचा भाग असतो वगैरे स्पष्टीकरणवजा समर्थन परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दिलेलेच आहे. अजूनही अशी काही विमाने येत आहेत. हा मुद्दा अमेरिकेकडे उपस्थित करू, असे आश्वासन भारताच्या परराष्ट्र सचिवांनीही दिले आहे. त्यामुळेच, स्थलांतरितांना मिळालेल्या अवमानास्पद वागणुकीचा अर्थ सर्वसामान्य जनता, अनेक माध्यमे आणि सरकार व समर्थक अशांनी भिन्न प्रकारे लावला असे दिसते. कारण यावरून प्रकटणारी सार्वत्रिक चीड सरकारी पातळीवर झिरपलेली दिसत नाही. भारत हा लोकशाही देश. अमेरिकेचा मित्र देश. चीन, रशिया यांच्या पुंडाईविरोधात आश्वासक भूमिका बजावू शकेल असा देश. जागतिक दहशतवादाविरोधात अमेरिकेच्या नेहमीच खांद्याला खांदा लावून उभा राहिलेला देश. अशा देशाच्या नागरिकांना, भले ते बेकायदा असोत, पण दहशतवादी, तस्करांप्रमाणे उच्च सुरक्षेअंतर्गत बेड्या ठोकून पाठवले कसे जाऊ शकते? असाच प्रकार डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'नया अमेरिके'ने मेक्सिको, कोलंबिया या देशांच्या बेकायदा स्थलांतरितांबाबतही करायचा ठरवला, तेव्हा या दोन्ही देशांनी अत्युच्च पातळीवरून सरकारला जाब विचारला होता. आपण तो विचारू शकत नाही, विचारू इच्छित नाही. जवळपास १८ हजार भारतीयांना अशाच पद्धतीने पाठवले जाऊ शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी या महिन्याच्या १२ तारखेस अमेरिकेत त्यांचे मित्र डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीसाठी जात आहेत. त्याच वेळी अशाच एखाद्या विमानाने अमेरिकेतून बेकायदा भारतीयांना घेऊन उड्डाण केले असेल किंवा पंतप्रधान जायच्या आधी असे एखादे विमान भारतात आलेही असेल. त्यांनाही असेच बेड्या घालून आणले, तर हा मुद्दा मोदी ट्रम्प यांच्या समक्ष उपस्थित करतील?अमेरिकेतून आणल्या गेलेल्यांच्या पहिल्या तुकडीत तरी गुजरात आणि पंजाबमधील नागरिकांची संख्या अधिक दिसते. हे जरा बुचकळ्यात टाकणारेच. कारण यांतील पहिले राज्य सधन उद्योगप्रधान आणि दुसरे सधन कृषिप्रधान. म्हणजे येथे बेरोजगारीचे प्रमाण देशाच्या सरासरीच्या तुलनेत तरी कमी असणे अपेक्षित. रोजगाराच्या संधी मिळण्याची शक्यता इतर अनेक राज्यांपेक्षा अधिक असणे अपेक्षित. गायपट्ट्यातली हिंदी भाषक राज्ये, ओडिशा-झारखंडसारखी आदिवासीबहुल राज्ये येथून खरे तर रोजगारार्थी देशभर फिरत असतात. पण अमेरिका, कॅनडा, युरोप येथे जमेल त्या अवैध मार्गांनी आणि अनाम, अनैतिक हस्तकांच्या माध्यमातून जाणाऱ्यांमध्ये गुजरात आणि पंजाबातील मंडळींचे प्रमाण अधिक असते. उद्यामशीलतेविषयी आणि शारीरिक क्षमतेविषयी अधिकारवाणीने बोलणाऱ्या या राज्यांतील मंडळींनी याविषयीदेखील बोलावे. 'व्हायब्रंट गुजरात'च्या माध्यमातून गुंतवणुकीचे इव्हेंटी, झगमगते प्रदर्शन मांडणाऱ्यांनीही या मुद्द्यावर प्रामाणिक, परखड मतप्रदर्शन केल्याचे आढळत नाही. पंजाबमधील शेती आणि शेतीआधारित रोजगार यांचा ओसरता काळ सुरू झाल्याचा इशारा विश्लेषक गेली अनेक वर्षे देत आहेत. परवा विमानातून परतलेल्यांपैकी काहींनी एजंटांना एक-एक कोटी रुपये मोजून अमेरिकेची वाट धरली होती. काही जण दुबई ते ब्राझील ते कोलंबिया ते ग्वाटेमाला-मेक्सिको अशा मार्गांनी अमेरिकेत कित्येक दिवसांनी पोहोचले. गुजरातमधील एक चौकोनी कुटुंब जानेवारी २०२२ मध्ये कॅनडातून अमेरिकेत अवैध प्रकारे शिरण्याच्या प्रयत्नात असताना थंडीने गोठून मरण पावले. त्यानंतर स्थानिक पोलीस आणि सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडी यांनी तपास केला त्यावेळी धक्कादायक माहिती उघडकीस आली. कित्येक जण कॅनडात उच्चशिक्षण घेण्याच्या नावाखाली जातात आणि कॅनडातून अमेरिकेत घुसण्याचा मार्ग पत्करतात. हे सारे एजंटांमार्फत घडते. महाविद्यालयीन शिक्षणाच्या निमित्ताने व्हिसा मिळतो. कॅनडात गेल्यानंतर प्रवेश कोणते तरी कारण देऊन रद्द केला जातो. तेथे येणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांपैकी कोणी प्रवेश घेतला, न घेतलेले जातात कोठे, त्यांचा माग काढून त्यांना मायदेशी पाठवावे इतकी कॅनडातील यंत्रणा तत्पर आणि सक्षम नाही. हे जाणूनच कॅनडातून अमेरिकेत शिरण्याचा मार्ग पत्करला जातो.याचाच अर्थ भारतीय मेक्सिको सीमेवरूनही अमेरिकेत शिरण्याचा प्रयत्न करतात नि कॅनडा सीमेवरूनही शिरण्याचा प्रयत्न करतात. यांतले दक्षिणेकडून म्हणजे मेक्सिको सीमेवरून जाणारे बऱ्याचदा दक्षिण आणि मध्य अमेरिकेतील अनेक देशांचा प्रवास पायी करून आलेले असतात. या देशांमध्ये त्यांना पुरेसे अन्न, इतर सुविधा, औषधोपचार वगैरे पुरवण्याची जबाबदारी ना संबंधित एजंटांची असते, ना त्या-त्या सरकारची. या प्रत्येक मार्गावर बहुधा उगम देश सोडला तर या मंडळींची वाटचाल छुप्या मार्गांनी आणि अटक व मृत्यू टाळतच होत असते. कारण त्यांना कोणतेही कायदेशीर अस्तित्व नसते. बऱ्याचदा ग्वाटेमाला, एल साल्वाडोरसारख्या देशांचे पोलीसही प्रचंड भ्रष्ट असल्यामुळे त्यांच्या देशात आलेली 'ब्याद' लवकरात लवकर शेजारील देशात कशी पाठवली जाईल याविषयीच ते दक्ष आणि तत्पर असतात. जंगलझुडुपांतून, वन्य श्वापदे आणि लुटारू टोळ्यांना चुकवत, नद्या आणि पर्वतांचे अडथळे ओलांडत 'अमेरिकन ड्रीम'च्या दिशेने होणारा हा जीवघेणा आणि प्रतिष्ठा मातीमोल करणारा प्रवास थेट मध्ययुगाची आठवण करून देणाराच. तो करताना यांची बुद्धी शाबूत असेलच ना. आपल्याकडून एक कोटी रुपये घेऊन कधी चेहराही न दाखवणारा, कॅनडात न झेपणाऱ्या उच्च शिक्षणासाठी ४० ते ५० लाख उकळणारा एजंट हाच आपण आणि अमेरिकेदरम्यानचा दुवा असल्याचे या साऱ्यांना पक्के ठाऊक होते. अमेरिकेत जाऊन आपण बेकायदा निवासीच बनणार आणि कधीही तेथून आपली भारतात पाठवणी होऊ शकते याचीही कल्पना बहुतांना असणारच. तरीदेखील इतकी मोठी जोखीम पत्करावी वाटते, याचा अर्थ त्यांना मायभूमीकडून किती अपेक्षा उरल्या आहेत, याचा अंदाज बांधता येतो. कोणत्याही सरकारने किंवा सरकारपुरस्कृत अर्थविश्लेषकाने याचा खोलात जाऊन विचार करण्याची तयारी आणि इच्छाशक्ती दर्शवलेली दिसत नाही. गुजरात आणि पंजाबसारख्या राज्यांतून ही 'गळती' सुरू राहते. याच्या मुळाशी आहे रोजगारनिर्मितीचे भीषण वास्तव नि त्यातून उद्भवणारी असीम अगतिकता. अमेरिकेतील स्वप्नाच्या मागे धावावे लागते, कारण एक स्वप्न येथील भूमीत केव्हाच विरलेले असते. अल्पकौशल्य किंवा मध्यम कौशल्याचे रोजगार, फुटकळ कामे, छोटा व्यापार, असलीच हाताशी पदवी तर तिची नोकरीत परिवर्तित होण्याची लुप्त झालेली क्षमता, कदाचित या अपयशांच्या मालिकांमुळे स्वकीयांकडून वा स्थानिक पातळीवर सततचा अव्हेर नि अपमान सोसावा लागणारी एक अवाढव्य प्रजा गुजरात, पंजाब आणि देशात मौजूद आहे. यांतील काहींना सरकारकडून आजही मिळणारे मोफत धान्य म्हणजे 'भीक' वाटत असेल. त्यापेक्षा सारे काही कुर्बान करून अमेरिकेची वाट धरलेली बरी, असा विचार करणारे या देशात असंख्य आढळतात हा धोरणकर्त्यांचा पराभव ठरतो. अमेरिकेकडून यापूर्वीही भारताची सरकारी पातळीवर निर्भर्त्सना झाल्याचे प्रसंग कमी नाहीत. डुकरांसाठीचा निकृष्ट गहूपुरवठा, इंदिरा गांधींविषयी निक्सन प्रशासनाच्या काळात व्यक्त झालेली आक्षेपार्ह टिप्पणी असे काही मासले देता येतील. परंतु तो काळ आणि आजचा काळ यात फरक झाल्याचे आपण धरून चालतो. भारत-अमेरिका संबंध यापूर्वी कधी नव्हते इतके सुधारल्याचे आपल्याला सांगितले जाते. म्हणूनच बहुधा, पूर्वी कधी दिसून आली नाही इतकी अवमानकारक वागणूक दिली जाऊनही आपण खुल्या दिलाने आपल्या मित्राला माफ करतो. 'डंकी' मार्गाने गेलेल्यांच्या पाठवणीच्या निमित्ताने 'माय फ्रेंड' ट्रम्प यांचा डंख सहन करतो.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत स्टीफन हॉकिंग यांची जयंती साजरी

केज ■ प्रतिनिधी



केजः जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत स्टीफन हॉकिंग यांची जयंती साजरी करण्यात आली आहे. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज या शाळेत वैज्ञानिक स्टीफन विल्यम हॉकिंग व 'भास्कराचार्य' यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.स्टीफन हॉकिंग यांचा जन्म ८ फेब्रुवारी १९४२ रोजी झाला.ते गणित तज्ञ व सैद्धांतिक वैज्ञानिक होते.भास्कराचार्य यांचा जन्म इ.सन १११४ मध्ये कर्नाटकमधील बिजापूर येथे झाला.त्यांनी 'लिलावती', बीजगणित,ग्रहगणित.इ.ग्रंथ लिहिले.पृथ्वीला सूर्याभोवती एक चक्कर पूर्ण करण्यासाठी ३६५ दिवस लागतात हे सिद्ध केले.ग्रहांची फिरण्याची गती,चंद्र आणि सूर्य ग्रहण इ.अभ्यास त्यांनी केला.अशी माहिती जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी दिली. 'राष्ट्रीय विज्ञान दिन विशेष' निमित्ताने 'भास्कराचार्य ' यांची माहिती दिली.या शाळेतील शिक्षक श्री भारत बाबुराव हांगे सर, श्री बाळासाहेब भिल्लु राठोड सर, श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम, श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम यांनीही सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बाळासाहेब भिल्लु राठोड सर यांनी केले व आभार भारत बाबुराव हांगे सर यांनी मानले.

उपमुख्यमंत्री शिंदे, खा. शिंदे यांच्या वाढदिवसानिमीत्त शिवसेनेच्या वतीने भगवा सप्ताह; विविध स्पर्धा, कार्यक्रम संपन्न

माजलगाव ■ दर्शन डोंगरे



माजलगाव : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथराव शिंदे व खा. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमीत्त महाराष्ट्रात भगवा सप्ताह साजरा होत असतांना त्याचाच एक भाग म्हणुन माजलगावातही शिवसेना, युवासेना, महिला आघाडी यांच्या वतीने भगवा सप्ताहात विविध स्पर्धा, कार्यक्रम मोठ्या उत्साहात दि. ४ ते १० फेब्रुवारी दरम्यान पार पडल्या.

शिवसेना सचिव संजय मोरे, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये दि. ४ फेब्रुवारी रोजी ग्रामदैवत सिध्देश्वरास महाआरती करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. दि. ५ फेब्रुवारीला हनुमान मंदिर, ओंकारेश्वर मंदिर, गणपती मंदिर, मंगलनाथ मंदिर,बालाजी मंदिरातील पुजा-यांचा सन्मान करण्यात आला. दि. ६ फेब्रुवारी रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात कराटे स्पर्धा घेण्यात आल्या. दि. ७ फेब्रुवारी रोजी किंग्स डान्स स्टुडिओ टवाणी कॉम्प्लेक्स येथे डान्स स्पर्धा, दि. ८ फेब्रुवारी रोजी मूकबधिर विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप, दि. ९ फेब्रुवारीला शासकीय रूग्णालयात जन्मलेल्या नवजात बालकांना बेबी कीटचे वाटप, दि. १० फेब्रुवारी रोजी मोरेश्वर विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या सर्व कार्यक्रमास शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके, महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदाताई डोईजड, युवासेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, शिवसेना उपतालुकाप्रमुख विकास झेटे, उपतालुकाप्रमुख माउली कदम, युवा सेना उपतालुकाप्रमुख रामेश्वर काशिद, विनोद कुलथे, वैजनाथ चव्हाण यांचेसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रियंका इंगळे सह मातापित्यांचा जीवन शिक्षण संकुल व बंसल क्लासेस च्या वतीने भव्य दिव्य सत्कार संपन्न



केज ■ प्रतिनिधी

केजः प्रियंका इंगळे सह मातापित्यांचा जीवन शिक्षण संकुल व बंसल क्लासेस च्या वतीने भव्य दिव्य सत्कार संपन्न झाला आहे.

याबाबतचे सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील कळंबअंबा येथील प्रियंका इंगळे हिने खो.खो संघाचे प्रतिनिधित्व करून वर्ल्डकप जिंकल्यामुळे बीड जिल्ह्यासह देशात प्रियंका इंगळे या नावाची चर्चा सध्या चालूआहे गरीब कुटुंबातील प्रियंका इंगळे हिने गरुड झेप घेत देशाचे प्रतिनिधित्व करत देशाला वर्ल्डकप जिंकून देशाची मान उंचावण्याचे कार्य प्रियांका इंगळे हिने केल्यामुळे केज शहरातील जनविकास शैक्षणिक संकुल व बंसल क्लासेस च्या माध्यमातून प्रियंका इंगळेसह तिच्या मातापित्यांचा सत्कार जीवन शिक्षण संकुलचे सचिव तथा जनविकास आघाडीचे सर्वेसर्वा हारुणभाई इनामदार तसेच केज नगरीच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व जीवन शिक्षण संकुल व बंसल क्लासेसच्या सर्व शिक्षक बांधवांच्या वतीने हा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला होता यावेळी शाळेचे सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी प्रियंकाने बोलताना सांगितले की मी पाचवीत असताना अशीच शाळेच्या बाहेर बसून व्याख्याने ऐकून माझ्या मनात एकच जिद्द होती ती मी पूर्ण केली आहे अशीच आपणही जिद्द व चिकाटी ठेवून अभ्यास करून ध्येय गाठावे असे मनोगत व्यक्त केले तर शाळेला भरपूर पटांगण असल्याने मुलांना खेळण्यासाठी ग्राउंड तयार करावे अशी सूचनाही प्रियंका इंगळे यांनी आपला भाषणात बोलताना स्पष्ट केले.

भक्तीला शक्तीची जोड द्या तरच प्रगती ह.भ.प.सिनलकर महाराज

मंचर ■ प्रतिनिधी



मंचर :भक्ती हा सेवेचा पाया आहे पण त्या भक्तीला शक्तीची जोड देण्याची आवश्यकता आहे 'शक्तिविना भक्ती निष्क्रीय आणि भक्तिविना शक्ती विनाशक ''हे आपण लक्षात घेतले पाहिजे.आपल्या संत महंतानी आपल्याला भक्तीची शिकवण दिली पण त्यासोबतच शक्तिचे महत्वदेखील पटवून दिलेले आहे त्या संताच्या विचारांचे पाईक होणे ही काळाची गरज आहे. आध्यात्मिक आणि भौतीक शक्तीची सांगड घालून त्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न केला तरच आपल्याला सुख समाधान आणि शांती मिळेल त्यासाठी शास्त्राचा आधार घेणे आवश्यक आहे असे विचार जेष्ठ किर्तनकार बबनराव महाराज सिनलकर(लोणी) यांनी व्यक्त केले.धामणी (तालुका आंबेगांव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिरात (सोमवारी) येथील दोन्ही महाद्वाराच्या मध्ये ओट्यावर बसविण्यात आलेल्या 'भक्ती शक्तीचे प्रतिक जगतगुरु संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संगमरवरी शिल्प अर्पण कार्यक्रमात ते बोलत होते .खडकवाडी (तालुका आंबेगांव) येथील भाविक ह.भ.प. गोविंदराव शंकरराव देशमुख व त्यांच्या कुटुंबियानी भक्ती शक्तीचे हे संगमरवरी शिल्प धामणीच्या खंडोबा देवस्थानास अर्पण केले धामणी येथील खंडोबा देवस्थानाचे महात्म्य खूप मोठे असून पुणे.नगर.नाशिक जिल्ह्यातील भाविकांचे हे देवस्थान कुलदैवत आहे. लोकवर्गणीतून मंदिराचा व परिसराचा चेहरामोहरा बदललेला असून पंचक्रोशीतील जागृत व प्रेक्षणीय तिर्थक्षेत्र म्हणून हे खंडोबाचे देवस्थान प्रसिध्द झालेले आहे.येथील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून पुरातन मंदिर जपलेले आहे.सर्व जातीधर्मातील लोकाचं छत्रपती शिवाजी महाराजांनी एकत्रीकरण केले तर सर्वाना समान वाटपसुध्दा केले.आदर्श राज्यपध्दती आणि जीव-शिव ऐक्याची शिकवणूक आपल्या कृतीतून मांडली गेली.जो गुरुचा झाला त्याला अधिष्ठान प्राप्त होते.त्यामुळे छत्रपती 'रयतेचे राजे' म्हणून चिरंतन स्मरणात राहीले असे सिनलकर महाराज यांनी यावेळी सांगितले. जीवनात केलेल्या तिर्थयात्राच्या शाहीस्नानाने व केलेल्या संत्सगाने दानधर्माने व पुरातन देवस्थानाच्या जिर्णोध्दाराने मानसिक दोषांची मुक्ती होते त्यामुळे सर्वानी त्यामध्ये सहभागी झाले पाहिजे सुखसमाधानाकरिता संत विचाराने जगण्याचा प्रयत्न करा मलिन झालेले तिर्थ संताच्या पदस्पर्शाने पुनीत होते.व तिर्थक्षेत्र आपल्याला पवित्र करतात असे ह.भ.प. तान्हाजी महाराज तांबे यांनी यावेळी सांगितले याप्रसंगी देणगीदार देशमुख कुटुंबियाचा देवस्थानाच्या वतीने सत्कार करण्यात आला याप्रसंगी सरपंच सौ रेश्मा बोऱ्हाडे.माजी सरपंच सागर जाधव.किसनमहाराज तांबे.दादाभाऊ भगत.सुभाष तांबे.धोंडीबा भगत.प्रकाश पाटील.प्रभाकर भगत.बाळासाहेब सिताराम विधाटे.राजाराम विधाटे.अरुणशेठ विधाटे.संदीपराव भुमकर,पांडुरंग भुमकर.मच्छिंद्र रोकडे.राजेश भगत.प्रविण जाधव .बाळासाहेब भगवे व देशमुख कुटुंबिय उपस्थित होते शिल्प अर्पण सोहळ्याचे पौरोहित्य प्रमोद देखणे यांनी केले

संत रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज जयंती महोत्सवास उपस्थित रहाः हरिभाऊ सवणे

माजलगाव ■ दर्शन डोंगरे



माजलगावः तालुक्यात गेल्या ३५ वर्षापासून संत शिरोमणी गुरु रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे यावर्षी सार्वजनिक एकत्रित जयंती महोत्सव साजरा करण्यात येणार आहे तरी या जयंती महोत्सवास उपस्थित राहावे असे आवाहन जयंती कमिटीचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संत रविदास महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे तसेच या जयंतीनिमित्त पद्माकर कांबळे (पी.के.) यांच्या वतीने उपहार ची व्यवस्था करण्यात आली आहे या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश (दादा) सोळंके उद्घाटक मोहन (दादा) जगताप हे लाभणार आहेत तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी या जयंती महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती कमिटीचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे, उपाध्यक्ष एड. गणेश,गवळी सचिव योगेश शिंदे, कार्याध्यक्ष भगवान सोनवणे, सदस्य वसंत वाघमारे, निमंत्रक राष्ट्रीय चर्मकार संघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके व भाजपा अनुसूचित जाती जमाती उपाध्यक्ष सत्यनारायण उणवने आयोजक राजेश जाधव,सचिन कांबळे, सुभाष कांबळे, संतोष जाधव,प्रसाद वाघमोडे, आश्विन खंडागळे, राधाकिसन भाळशंकर, आकाश कांबळे, एड. दत्ता जाधव,विकी मराठे, प्रीतम जाधव,मयूर वाघमारे, संतोष खंडागळे,अर्जुन पोहेकर यांनी आवाहन केले आहे

मुलांनो उंच भरारी घ्याः सांस्कृतिक महोत्सवात ठाणेदार सोनवने यांचे प्रतिपादन



विरुळ (आ.) ■ विनोद महाजन

विरुळ आकाजीः मुलांनो अभ्यास करून खुप मोठे व्हा..मोठे स्वप्न बघा उंच भरारी घेऊन आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करा.असे प्रतिपादन पुलगाव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राहुल सोनवने यांनी व्यक्त केले.ते राजकुल कांन्हवेंट च्या सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रमात बोलत होते.प्रत्येक शाळांमध्ये दरवर्षी च सांस्कृतिक महोत्सवाचे कार्यक्रम झाले च पाहीजे.अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध होऊन त्यांच्या त असलेल्या सुप्त गुणांना चालना मिळते..सर्वप्रथम पाहुण्यांच्या हस्ते फोटोचे पूजन करून द्विपप्रजवन करण्यात आले यावेळी मान्यवरांच्या हस्ते चिमुकल्यांना बक्षीस म्हणून ट्राफि देण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा)आशिष पांडे होते तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी चे तालुका प्रमुख तुषार वाघ डॉ.विजय राऊत माजी सरपंच दुर्गा प्रसाद मेहरे,ग्रामविकास अधिकारी प्रल्हाद खंडागळे पत्रकार सचिन देवताळे पत्रकार विनोद महाजन सुरेखा पंढरे गजानन थेटे राजकुल कांन्हवेंट अध्यक्ष राजेश बढे उपस्थित होते.यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी एक से बढकर एक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका निकीता सालंकर यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ.मेघा वलगावकर यांनी केले.कार्यक्रम आयोजनासाठी शिक्षिका रूपाली काळे वर्षा खराबे सोनाली काकडे सुनैना जाधव माधुरी निवल यांनी सहकार्य केले

मनसेच्या नादात, महायुतीचा मित्र वादात ?

परभणी ■ दत्तात्रय काळे



मनसे विरुद्ध राष्ट्रवादी या सुरु असलेल्या वादाचं रुपांतर आता भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अशा वादात झालं की काय ? जणू अशीच अशी चर्चा आता सुरु झालीय. निमित्त होतं, प्रवीण दरेकरांनी राज ठाकरेंना टोला लगावला, यावर बोलताना अमोल मिटकरींनी दरेकरांवरच जोरदार हल्ला चढवला. त्यामुळे महायुतीतील मित्रपक्षांमध्येच वाद सुरू झाल्याचं बोललं जाऊ लागलंय. कारण काही दिवसांपूर्वी मनसेच्या मेळाव्यात बोलताना राज ठाकरेंनी ईव्हीएमवर शंका उपस्थित करत अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे एवढे आमदार निवडून कसे आले ? याबद्दल आश्चर्य व्यक्त केलं होतं. त्यानंतर अजित पवारंनीही अमीत ठाकरेंच्या पराभवावरुन चिमटा काढला होता. किंबहुना मनसे विरुद्ध राष्ट्रवादी असाच वाद सुरू झाल्याचे चित्र दिसून आलं.

अजितदादांचा टोला निकाल अनाकलनीय असल्याचं म्हणताना राज ठाकरे यांनी अजित पवार राष्ट्रवादीचे ४१ आमदार निवडून येण्यावर जिव्हारी लागणारी शंका उपस्थित केली होती. राज ठाकरेंच्या याच शंकेला अजित पवारांनी तोडीसतोड उत्तर देताना स्वतः च्या मुलाला निवडून आणता आलं नाही असा सणसणीत टोला लगावला होता. अजित पवारांच्या या प्रतिक्रियेनंतर राजकारण तापू लागलं असतानाच आता राज ठाकरे अन् फडणवीसांची झालेली भेट अधिकच महत्त्वाची ठरत आहे. एकूणच काय तर 'मनसेच्या नादाय, महायुतीचा मित्र वादात ठरु नये म् णजे मिळवलं ?

समाज स्तरावर आयोजीत कार्यक्रमात परंपरा व संस्कृती कायम स्वरुपी जोपासत ठेवत ती पुढे कार्यान्वीत ठेवावी - मंत्री आदिती तटकरे

म्हसळा - रायगड ■ अरुण जंगम



म्हसळा - रायगड : तालुक्यातील मोठ्या लोकवस्तीच्या गोंडघर आणि खारगाव बुद्रुक येथील श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटना म्हसळा यांनी श्री विश्वकर्मा जयंती उत्सवाचे आयोजन करून सामाजिक,सांस्कृतीक व धार्मिक कार्यक्रम पार पाडले.आयोजीत कार्यक्रमात राज्याच्या महीला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे म्हसळा तालुका सुतार समाजाचे वतीने सत्कार करण्यात आला.या वेळी स्वागत कार्यक्रमात मंत्री आदिती तटकरे यांनी सामाजिक उपक्रमाला शुभेच्छा देताना सामाजिक कार्यक्रम पार पाडत असताना समाज परंपरा व संस्कृती जोपासत ठेवत ती कायम स्वरुपी कार्यान्वीत ठेवावी असे सुचित केले.निवडणूक कालावधीत सुतार समाजाने खासदार सुनिल तटकरे आणि मला चांगली साथ व सहकार्य केले आहे.आमच्या माध्यमातुन समाज मंदीर,संरक्षण भिंत आणि परिसर सुशोभीकरण करण्याचे काम करण्यात आले आहे.नव्याने मंदिर दुरूस्ती व सामाजिक सभागृह बांधकामाला आवश्यक लागणारा निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन देत सरपंच अनंत नाक्ती यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला त्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी स्वागत केले.कार्यक्रमाला मंत्री

आदिती तटकरे यांचे समावेत गट विकास अधिकारी माधव जाधव,स.पो.नि.संदिप कहाळे,ओएसडी शहाजी भोसले,अनिकेत पवार,

जिल्हा चिटणीस महादेव पाटील,महीला अध्यक्षा मिना टिंगरे,रेश्मा काणसे,नगर पंचायत सभापती सुनिल शेडगे,समाज अध्यक्ष दत्ता सुतार,उपाध्यक्ष दत्तात्रय चिचघरकर,सचिव संदीप कार्लेकर,गण अध्यक्ष अनिल बसवत,माजी सभापती संदीप चाचले,सरपंच अनंत नाक्ती,गणअध्यक्ष अनिल बसवत,नाना सावंत,शाहिद उकये,किरण पालांडे,गणेश नाक्ती,गजानन पाखड,समाज सेवक तुकाराम सुतार,पांडुरंग सुतार,नामदेव घुमकर,अशोक सुतार,कृष्णा सुतार,संतोष उद्धरकर,संदीप,किरण,राजु,कम्लेश सुतार,प्रकाश म्हाप्रलकर,महीला अध्यक्षा शैलजा सुतार आदि मान्यवर उपस्थित होते.

वाई मांढरदेवी रस्त्याच्या कामामुळे वाहतुकीचा बोजवारा

वाई ■ शुभम कोदे



वाई :वाई मांढरदेव रस्त्याचे काम चालू असल्यामुळे ठेकेदाराकडून योग्य नियोजन न केल्याने आज काळुबाई देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना घाटात वाहतूक कोंडीचा फटका बसला भाविक घाटामध्ये दोन ते तीन तास ताटकळत बसावे लागले त्यामुळे भाविकांमधून तीव्र नाजाजीचा सूर उमटला आहे. कापूरहोळ-भोर-मांढरदेव-वाई अशा मार्गाचे काम दोन वर्षापासून चालू आहे या कामासाठी मांढरदेवी-भोर घाट काही महिने बंद ठेवण्यात आला होता या घाटाचे काम चालू असतानाच वाई मांढरदेवी घाटाच्या कामाला ठेकेदाराने प्रारंभ केला आहे.

काम चालू असताना रस्ता खोदण्याचे काम सुरू आहे मात्र पर्यायी मार्गाची व्यवस्था नीट न केल्याने श्री काळुबाईच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांना घाटात आज दोन ते तीन तास ताटकळत राहावे लागले घाटात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याने भाविक ताटकळत राहिले यामुळे भाविकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटला. घाटात झालेली वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी भाविकच प्रयत्नशील होते प्रशासनाने मात्र याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

आज रविवार सुट्टीचा वार असल्याने मांढरदेव मध्ये देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी होती भाविक दुचाकी, रिक्षा, कार,बस या साधनांनी मांढरदेवला येत होते मात्र वाईहून आल्यावर तीन तास घाटात अडकून पडल्याने मांढरदेव येथे तीन तास उशिरा पोहोचत होते वास्तविक एकेरी वाहतूक चालू असताना ठेकेदारांनी काही लोक नेमून वाहतूक सुरळीत ठेवणे अपेक्षित होते मात्र तसे न झाल्याने पुणे,मुंबई,नाशिक,कोल्हापूर,सातारा, वाई या ठिकाणाहून आलेले भाविक घाटातच अडकून पडले त्यामुळे भाविकांना नाहक त्रास सोसावा लागला. प्रशासनाने या बाबीची दखल घेऊन योग्य नियोजन करावे अशी मागणी भाविकांमधून होत आहे.

वाईची खेळाडू सृष्टी जाधव जिल्हा गुणवंत खेळाडू पुरस्काराने सन्मानित

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणारा सातारा जिल्हा गुणवंत खेळाडू पुरस्कार या वर्षी फेन्सिंग(तलवारबाजी) खेळाडू तसेच किसनवीर कनिष्ठ महाविद्यालय वाई खेळाडू कु. सृष्टी ज्ञानेश्वर जाधव हिला देण्यात आला .

सृष्टी ही मूळची वरखडवाडी गावाची आहे . ती एन.आय.एस प्रशिक्षक प्रफुल्ल जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे .सृष्टीने तलवारबाजी खेळामध्ये आंतरराष्ट्रीय ,वरिष्ठ,कनिष्ठ गटात राष्ट्रीयव राज्यस्तरीय पदके मिळवली आहे. नुकत्याच पार पडलेल्या सिनियर नॅशनल फेन्सिंग चॅम्पियनशिप मध्ये तिला सांघिक कांस्य पदक मिळाले व तिची उत्तराखंड येथे होणाऱ्या नॅशनल गेम्ससाठी निवड झाली तसेच या वर्षी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय वर्ल्ड कप स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवणार आहे. तीच्या या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा यांच्या मार्फत प्रजाकसत्ताक दिनाचे औचित्य साधून जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार शंभूराज देसाई साहेब यांच्या हस्ते जिल्हा गुणवंत खेळाडू पुरस्कार देण्यात आला.या कार्यक्रमाप्रसंगी कलेक्टर मा.श्री. संतोष पाटील साहेब तसेच सातारा जिल्हा पोलिस अधीक्षक समीर शेख साहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) श्रीमती. याशनी नागराजन, जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर साहेब हे उपस्थित होते.

सृष्टीच्या या यशाबद्दल जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. मदनदादा भोसले साहेब, क्रीडा मार्गदर्शक दत्तात्रय देसाई , समीर पवार,सुधिर जमदाडे, सचिन चव्हाण, मदन जाधव तसेच ग्रामस्थ मंडळ वरखवाडी यांनी तिचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन केले आहे.

कार्यकर्तृत्वाची रांगोळी रेखाटून यशाची शिखरे गाठावीत--श्री काटकर.

कराड ■ राहुल पवार

सातारा कराड : श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट कराडच्या सविस्तर वृत्त..दानशूर भास्कररराव शामराव थोरात विद्यालय कार्वे मध्ये एस.एस.सी. मार्च २०२५ च्या विद्यार्थ्यांचा अभिष्टचिंतन समारंभ शुक्रवार दिनांक ३१/०१/ २०२५ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्री . पोपट माणिकराव काटकर (प्राध्यापक नेताजी सुभाषचंद्र विद्यालय अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स येळगाव) यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाताना विविध प्रसंगातून मार्गदर्शन केले. तसेच आपल्या कार्यकर्तुत्वांनी आपल्या स्वतःचे शाळेचे व संस्थेचे नाव मोठे करावे असेही सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ थोरात यू ए यांनी तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. बागवान आर. आय. यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय श्री पाटील एस. व्ही. यांनी केला विद्यार्थी मनोगतात कु शर्वरी घाडगे, कु दिव्याणी थोरात, कु सुप्रिया खिलारी, कु श्रुतिका थोरात, कु आलिशा मुजावर यांनी ५ ते १० अखेर त्यांना आलेले विविध अनुभव साध्या सोप्या भाषेत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार विद्यालयाच्या कार्यध्यक्षा निकम जे एस यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जाधव एस. एच. यांनी केले

लोणंद मध्ये अतिक्रमण मोहीम राबवणार

लोणंद ■ पांडूरंग कुंभार



लोणंद : लोणंद शहरामध्ये उद्या सोमवार दिनांक दहा तारखेला अतिक्रमण मोहीम राबवणार आहेत याची कल्पना तीन ते चार दिवस आधीच दिली होती त्यामुळे जवळजवळ ८० टक्के अतिक्रमण धारकांनी त्यामध्ये खोकीधारक हॉटेल धारक फळ विक्रेते सलून व्यावसायिक यांनी स्वखर्चाने आपापले अतिक्रमण काढून घेतले आहे त्यामुळे लोणंद मधील लोणंद सातारा रोड लोणंद शिरवळ रोड तसेच लोणंद खंडाळा रोडने मोकळा श्वास घेतला आहे सर्व खोकी धारकांचे पुनर्वसन लोणंद एसटी स्टँड समोरील मोकळ्या जागेत करून देण्यात येणार असल्याने खोकी धारकांनी शासकीय कामात अडथळा आणला नाही. पुनर्वसनचे काम लवकरात लवकर व्हावे अशी लोणंद मधील खोकी धारकांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. रविवारी संध्याकाळी साडेपाच वाजता डॉ. नितीन सावंत यांनी शिरवळ चौकात भेट देऊन सर्व खोकेदारकांचे म्हणणे ऐकून डॉ. सावंत म्हणाले की , लोणंद मधील सर्व शासकीय कर्मचारी सहकार्य करत असून त्यांनी लवकरात लवकर पुनर्वसन करून खोके धारकांना न्याय मिळावा कारण मार्च एंड असल्या मुळे खोटेधारकांना बँकेचे हप्ते भरण्याचे अवघड होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आणि सर्वांनी स्वखर्चाने अतिक्रमण काढून घेतले त्यामुळे सर्वांचे आभार मानले तसेच रोडचेही काम लवकरात लवकर व्हावे व इलेक्ट्रिक खांब रस्त्यामधून हटवून जी काही इलेक्ट्रिक खांबामुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहे तेही लवकरात लवकर दूर करावे

जिल्हास्तरीय हॅकेथॉन स्पर्धेत म्हसळा चिखलप शाळेचा प्रथम क्रमांक

म्हसळा - रायगड ■ अरुण जंगम



म्हसळा - रायगड : राज्य शैक्षणीक अंशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे आयोजीत जिल्हास्तरीय प्रदर्शित केलेल्या हॅकेथॉन स्पर्धेत गट निहाय मूल्यांकन केलेनुसार म्हसळा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद चिखलप शाळेचा जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे.चिखलप शाळेने प्रथम क्रमांक पटकावला असल्याचे प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल डॉ.आय.ए.इनामदार यांनी प्रसिद्ध पत्राद्वारे कळविले आहे.हॅकेथॉन स्पर्धेत चिखलप शाळेला यश संपादन करण्यासाठी मुख्याध्यापक महादेव पवार यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.शाळा शिक्षक हर्षल सुर्यवंशी,विध्यार्थी अथर्व राजकुमार शिर्के,श्रावणी विनायक निर्मळ यांनी 'चालक सुरक्षा यंत्र' उपयोग व फायदे यावर आधारित मॉडेल लॉन्च केला असता त्यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

शिक्षण,कला क्रीडा आणि शासनाचे सर्वच उपक्रमात राजीप चिखलप शाळेने तालुक्यात नाव लौकिक प्राप्त करून गावाचे व तालुक्यांचे नाव जिल्हा स्तरावर उज्वल केले आहे.त्यांचे या यशाचे खासदार सुनिल तटकरे, महीला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे,तालुका सर्वपक्षीय आजी माजी लोकप्रतिनिधी,गट विकास अधिकारी माधव जाधव,गट शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण,शिक्षक पालक समिती सदस्य यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

समता फाउंडेशन व रामदास पाटील सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने नेत्र तपासणी

दै, जनप्रभात सोयगाव प्रतिनिधी ■ भावराव मोरे



सोयगाव : समता फाऊंडेशन आणि रामदास पाटील बनोटी कर सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने आ. संजनाताई जाधव यांच्या वाढदिवसानिमित्ताने बनोटी (ता.सोयगाव) येथे रविवारी (ता. ०९)घेण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शिबिरात प्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. अनिल पवार आणि अरुणकुमार भाले यांनी जवळपास पाचशे रुग्णांची तपासणी केली.

आमदार संजनाताई जाधव यांच्या वाढदिवसानिमित्ताने आयोजित नेत्रतपासणी शिबीराचे उद्घाटन अमृतेश्वर गोमुख संस्थान चे मठाधिपती भानुदास महाराज यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी सरपंच मुरलीधर वेहळे, नितीन बोरसे, सेवा संस्थेचे चेअरमन प्रदिप सोनवणे, मुकेश जैन, सुनिल भदाणे, दिनेश जाधव, तात्याराव वाडेकर दिनेश जाधव रुषिकेश सोनवणे उपस्थित होते. सकाळ पासुन बनोटी परिसरातील ग्रामस्थांनी तपासणी करीता मोठी गर्दी केली डॉ. अनिल पवार, डॉ अरुणकुमार भाले यांनी सकाळपासून सायंकाळ पर्यत ५३० रुग्णांची नेत्रतपासणी केली यातील १५० रुग्णांवरती संभाजीनगर येथे नेत्र शत्र्यक्रिया करण्यात येणार आहे. सर्व रुग्णांची प्रयोगशाळा सहायक ईश्वर निकम, संदिप चव्हाण यांनी शत्र्यक्रिया करण्यापुर्वीच्या चाचण्या घेण्यात आल्या.यासाठी अक्षय सोनवणे आदींची उपस्थिती होती.

मसूर प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्वविद्यालयाचा पंधरावा वर्धापन दिन उत्साहात साजरा





कराड ■ अनिल मोरे

कराड : येथील मसूर प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरी विश्व विद्यालयाचा पंधराव्या वर्धापन दिन निमित्त राजयोगिनी आशीर्वचन ब्रह्माकुमारी सुनंदा दीदी,सबझोन इन्चार्ज मीरा सोसायटी पुणे. यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेचे साधक मान्यवरांच्या समवेत ब्रह्मकुमारी संस्थेच्या हॉलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी आशीर्वचन राजयोगिनी ब्रह्मकुमारी सुनंदा दीदी, पुढे म्हणाल्या राजयोग मेडिटेशनचा नियमित अभ्यास केल्याने वैर,क्रोध,अहंकार,द्वेष, दुर्भावना, नैराश्या, आळस , कंटाळा, न्यूनगंड दूर होतो. तसेच राजयोगाच्या नियमित सरावाद्वारे आत्मा आणि परमात्म्याचा परिचय, होतो. त्यामुळे मनाची एकाग्रता वाढते. मनाला शांती, मिळते. आपले मन योग्य निर्णय, घेते. झोप शांत, लागते. कर्मामध्ये, सुधारना होते. आचरणामध्ये शुद्धता,निर्माण होते. असे अनेक प्रकारचे लाभ, या नियमित राजयोगाच्या सरावाद्वारे मिळतात. यासाठी ब्रह्मकुमारी संस्थेमध्ये विनाशुल्क सात दिवसाचा कोर्स, पूर्ण करावा लागतो. या सात दिवसांमध्ये दररोज फक्त एक तास तुम्ही वेळ द्यायचा असतो. या कोर्समुळे आपल्याला आत्मिक ज्ञान प्राप्त होऊन जीवनाचे खरे सत्याचे दर्शन घडते. असे त्या संस्थेच्या कार्यक्रमा वेळी बोलत होत्या.

यावेळी कार्यक्रमाला आशीर्वचन राजयोगिनी ब्रह्मकुमारी सुनंदा दीदी, सबझोन मीरा सोसायटी पुणे. मसूर सेंटरचे मुख्य संतोष भाई,शैलजा बेहन, तसेच मनीषा बहेन, सुजाता बेहन, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत जिरंगे, नंदकुमार पाटील, पत्रकार गजानन गिरी, अनिल मोरे, कुलदीप मोहिते, राहुल पवार, रूपाली सावंत, गुरव आदी सर्व मान्यवर आणि साधक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी कराड या संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल करवडी विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभ चिंतन समारंभ संविद्यार्थ्यांनी स्वाध्यायन केल्याने यश निश्चित मिळेल काही गोष्टीचा जीवनामध्ये विद्यार्थ्यांनी मोह टाळावा सोशल मीडिया व इतर बाबतीचा अतिरिक्त वापर करू नये कल्याणी कावरे.

कराड ■ राहुल पवार



कराड सातारा : महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी कराड या संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल करवडी विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभ चिंतन समारंभ संपन्न झाला.

शनिवार दिनांक ८/०२/२५ रोजी सकाळी दहा वाजता विद्यालयाच्या २०वी एसएससी बॅच चा शुभचिंतन समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी आयटीआय इन्स्ट्रक्टर कल्याणी कावरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्या म्हणाल्या की जीवनामध्ये यश मिळवण्यासाठी आपल्याला वेळेचे नियोजन करणे आवश्यक्य आहे आजच्या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा आहे परंतु विद्यार्थ्यांची मानसिकता महत्त्वाचा विषय बनला आहे आज काल विद्यार्थी सोशल मीडिया व इतर गोष्टी गुंतल्यामुळे प्रचंड तणाव निर्माण होत आहे यासाठी विद्यार्थ्यांनी योग्य नियोजन करावे इतर गोष्टींचा मोह टाळावा असे आव्हान त्यांनी केले यावेळी अनिकेत पिसाळ यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात स्वतः जागृत राहून स्वाध्याय केले पाहिजे या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

प्रास्ताविक श्री थोरात सर यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संचालक माननीय श्री बाळासाहेब जगदाळे तात्या.

सचिव श्री संभाजी चव्हाण सर, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विद्यालयाचे माजी विद्यार्थी कुमार अनिकेत आनंदराव पिसाळ (सहकार सहाय्यक) व कुमारी कल्याणी बाळासो कावरे (आयटीआय इन्स्ट्रक्टर) विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री थोरात सर , शिक्षक श्री वेताळ सर, विद्या चव्हाण मॅडम, प्रमिला चव्हाण मॅडम, कुंभार सर, पानस्कर सर, प्रवीण कांबळे हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा साठी शुभेच्छा दिल्या. मी कसा घडलो याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

संस्थेच्या वतीने श्री बाळासाहेब जगदाळे तात्या व श्री संभाजी चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला

सूत्रसंचालन विद्या चव्हाण मॅडम यांनी केले. श्री वेताळ सर यांनी मनोगत व्यक्त केले. सौ प्रतिमा चव्हाण मॅडम यांनी आभार मानले.पन्न झाला.

शनिवार दिनांक ८/०२/२५ रोजी सकाळी दहा वाजता विद्यालयाच्या २०वी एसएससी बॅच चा शुभचिंतन समारंभ आयोजित करण्यात आला होता.

प्रास्ताविक श्री थोरात सर यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संचालक माननीय श्री बाळासाहेब जगदाळे तात्या. सचिव श्री संभाजी चव्हाण सर,

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विद्यालयाचे माजी विद्यार्थी कुमार अनिकेत आनंदराव पिसाळ (सहकार सहाय्यक) व कुमारी कल्याणी बाळासो कावरे (आयटीआय इन्स्ट्रक्टर)

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री थोरात सर , शिक्षक श्री वेताळ सर, विद्या चव्हाण मॅडम, प्रमिला चव्हाण मॅडम, कुंभार सर, पानस्कर सर, प्रवीण कांबळे हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा साठी शुभेच्छा दिल्या. मी कसा घडलो याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

संस्थेच्या वतीने श्री बाळासाहेब जगदाळे तात्या व श्री संभाजी चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला सूत्रसंचालन विद्या चव्हाण मॅडम यांनी केले. श्री वेताळ सर यांनी मनोगत व्यक्त केले. सौ प्रतिमा चव्हाण मॅडम यांनी आभार मानले.

बीडला करायचेय 'जंक्शन';विविध कामांसाठी खा.सोनवणे रेल्वेमंत्र्यांच्या भेटीला केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत झाली सकारात्मक चर्चा

केज ■ प्रतिनिधी



केजः अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचे काम गतीने सुरू आहे. बीडपर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी देखील झाली असून पुढील वर्षात रेल्वेचे काम परळीपर्यंत पोहचेल व परळी ते मुंबई गाड्या बीडमार्गे जाऊ शकतील. दरम्यान, येडशी-बीड-जालना अथवा धाराशिव-बीड-छ.संभाजीनगर हा रेल्वेमार्ग मंजूर झाला तर बीडला मोठे जंक्शन होईल. यासाठी, खा.बजरंग सोनवणे यांनी दिनांक १० फेब्रुवारी रोजी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. यावेळी नवीन रेल्वे मार्गाबाबत सकारात्मक चर्चा झाली.

बीड जिल्हा तसा महाराष्ट्राच्या मध्यभागी असलेला जिल्हा आहे. मात्र, याठिकाणी रेल्वेलाईन नसल्याने येथे मोठे उद्योग येऊ शकले नाही. दळणवळणाचा खर्चीक भाग असल्याने कंपन्या आणि व्यवसायाला चालना मिळालेली नाही. आता अहिल्यानगर-परळी रेल्वेमार्गाला गती मिळत आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभा निवडणूकीत विजयाचा गुलाल अंगावर पडताच पहिली बैठक रेल्वेची घेवून आहे त्या रेल्वे मार्गाला गती देण्याचा प्रयत्न केला. त्याचेच फळ आता दिसत असून अवघ्या सहा-सात महिन्यात अंमळनेर ते बीडपर्यंत रेल्वे धावली आहे. दरम्यान, जालना ते येडशी अथवा धाराशिव ते छ. संभाजीनगर हा रेल्वे मार्ग जोडला तर बीडला मोठे जंक्शन होऊ शकते. शिवाय बीड हे राज्यात सेंटरला येऊन विकासाला गती मिळू शकते. हे लक्षात घेवून सोमवारी खा.सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांची भेट घेत, येडशी-बीड-जालना नवीन रेल्वे लाईनसाठी सर्व्हेक्षण करणे तसेच प्रस्तावित धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर रेल्वे लाईनचे ४८५७.४७ कोटी रुपये अंदाजित रकमेचे अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणे. आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गावर बार्शी नाका बीड येथील प्रस्तावित जागेवर नवीन रेल्वे स्थानक/थांबा देणे,

?आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गातील उर्वरित प्रलंबित भूसंपादन प्रकरणे तातडीने मंजूर करणे,अशा मागण्यांचे पत्र दिले.

केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी दिले आश्वासन

आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग पूर्ण करण्यासाठी बीड येथे झालेल्या दि. १८ जून २०२४ च्या बैठकीमधे रेल्वे अधिकारी यांचेसोबत झालेल्या बैठकीमध्ये कालबद्ध कार्यक्रम ठरऊन देण्यात आला होता, त्यानुसार कामे पूर्ण करुन घेण्याचे आदेश देऊन इतर सर्व कामांबाबत दखल घेऊन योग्य असेल ती सर्व कामे करणेबाबत आश्वासित केले. छ.संभाजीनगर-गुंटूर, नांदेड-बेंगलुरु व पनवेल-नांदेड या गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा देण्याबाबत चालू असलेल्या कारवाईचा आढावा घेतला.

पायी वारी लेखक प्रसिद्ध ग्रामीण कवी सोमनाथ कोंडीभाऊ चौधरी यांना एक मैफिल कवितांची साहित्य मंच काव्यरत्न पुरस्कार जाहीर

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : पारनेर तालुक्यातील करंदी गावचे प्रसिद्ध युवा कवी सोमनाथ चौधरी यांना एक मैफील कवितांची साहित्य मंच व सत्या शोधक विचारमंथन चा या वर्षीचा काव्यरत्न पुरस्कार रविवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी पिंपरी कोलंदर येथे प्रसिद्ध कवी गझलकार रज्जाक शेख , प्रसिद्ध कवी सागर काकडे व ह भ प बाळासाहेब महाराज धोत्रे यांच्या हस्ते सत्या शोधक विचार मंथन आश्रम पिंपरी कोलंदर येथे प्रदान करण्यात येणार आहे. कवी सोमनाथ चौधरी यांचे पायी वारी एक प्रवास वर्णन पुस्तक प्रकाशित आहे व एक ग्रामीण कवी लेखक म्हणून त्यांची संपूर्ण महाराष्ट्र भर ओळख आहे. त्यांच्या अनेक ग्रामीण कवितांनी रसिकांची मने जिंकली आहेत. त्यासोबतच ग्रामीण कथाकार म्हणून ही त्यांची ओळख आहे. अनेक लघुपटात ही त्यांनी भूमिका साकारल्या आहेत. सुगंधा, दिक्षा, सदाफुली वैपो भिडेवाडा या लघुपटात त्यांनी आपल्या अभिनयाची झलक दाखवली आहे. त्यांचा अनेक ठिकाणी समाज कार्यात ही मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. टीम आड वाटेचं पारनेर या संस्थेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी वृक्षारोपण, गड किल्ले संवर्धन यात त्यांनी सहभाग घेतला आहे. एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. लवकरच त्यांचा कविता संग्रह व पायी वारी या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित होणार आहे.

दरम्यान एक मैफील कवितांची साहित्य मंच व सत्या शोधक विचार मंथन च्या वतीने राज्यस्तरीय काव्य वाचन स्पर्धा पार पडणार आहेत. असे कवी महाबली मिसाळ व कवी कुमोद रणदिवे यांनी सांगितले.

शिरूर तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या वतीने सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन !

पुणे ■ विवेकानंद फंड

पुणे : शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता पहिली ते सातवी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अ.भा.मराठी बालकुमार साहित्य संस्था पुणे,शाखा शिरूर यांच्यावतीने सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे संस्थेचे अध्यक्ष राहुल चातुर व मुख्य कार्यवाह विवेकानंद फंड यांनी सांगितले. या हस्ताक्षर स्पर्धेसाठी छत्रपती शिवाजी महाराज, माझी आई व स्वच्छ भारत सुंदर भारत या विषयांवर विद्यार्थ्यांनी २० ओळींपर्यंत सुंदर हस्ताक्षरामध्ये लेखन करणे अपेक्षित आहे. दि. १० फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सहभागी शाळांनी आपल्या शाळेमधील इयत्ता निहाय प्रथम क्रमांक निवडून त्यांचे हस्ताक्षर पेपर संस्थेकडे जमा करणे अनिवार्य आहे. शाळा स्तरीय प्रथम क्रमांक स्पर्धकांमधून तालुकास्तरीय पुरस्कारासाठी इयत्ता पहिली ते सातवी मध्ये प्रथम,द्वितीय व तृतीय असे एकूण २१ क्रमांक निवडण्यात येतील. सदर स्पर्धा ही ऐच्छिक व विनामूल्य आहे. विजेत्या स्पर्धकास प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात येईल. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

हस्ताक्षर पेपर जमा करण्यासाठी संपर्क खालील प्रमाणे : श्री.राहुल चातुर(अध्यक्ष अ.भा.म.बालकुमार साहित्य संस्था,शिरूर) ९८२२४०४२१८ व ८७८८८८७०४१, श्री.सचिन बेंडभर(राज्य प्रतिनिधी अ.भा.मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे) ९८२२९९९३०६, श्री.मनोहर परदेशी (अध्यक्ष म.सा.परीषद, शिरूर ग्रामीण) ९८२२५६६९८४, श्री.संजीव मांढरे(कार्याध्यक्ष अ.भा.म. बालकुमार साहित्य संस्था) ९८५०१५३२२९,श्री.विवेकानंद फंड(प्रमुख कार्यवाहक अ.भा.मराठी बालकुमार साहित्य संस्था) ९०४९०४३०९६, श्री.गुरुनाथ पाटील(उपाध्यक्ष अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था.) ९९२१२२४०१३ सर्व विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषद,शिरूर ग्रामीणचे अध्यक्ष मनोहर परदेशी यांनी केले आहे.

वाई तालुक्यातील पांडवगडावर गिर्यारोहकांवर मधमाशांचा हल्ला; सहा जणांवर केला हल्ला दोन जण गंभीर जखमी



वाई ■ शुभम कोदे

वाई :वाई तालुक्यातील पांडवगडावर इंदापुर तालुक्यातील सहाजणांनवर हजारो मधमाशांनी आज सकाळी सात वाजता भीषण हल्ला करून चावा घेतल्याने अल्हाद दंडवते निखिल क्षिरसागर गोपाळ आवटी गोपाळकर दंडवते,संतोष जापे, चैतन्य देवळे इतर दोन बेशुद्ध अवस्थेत आहेत.याची माहिती वाई पोलिसांना आणी वाई पंचायत समिती मध्ये असणारे वाई तालुका वैद्यकीय कक्षाला समताच पाच रुग्ण वाहिकासह वाई पोलिस ठाण्याचे हवलदार श्रीनिवास बिराजदार डिबीचे विभागाचे नितीन कदम कवठे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डाक्टर दिलिप भोजने नरेंद्र सणस सि.बी.जाधव अजीत चव्हाण गिता वाठारकर या वैद्यकीय टीमने तातडीने पाच किमी. डोंगर चढून घटनास्थळी पोहोचले आणी जखमीनचा शोध घेवून त्यांच्यावर प्राथमिक उपचार सुरू करून तब्बल पाच किलो मीटर पाऊल वाटेने खाली आणण्यात आले.पुढील उपचारासाठी त्यांना रुग्णवाहिकेतून वाईच्या ग्रामीण रूग्णालयात दाखल केले आहे .

शिरुर तालुक्यातीलं ऊघकार्यकर्त्याच्या हत्येचा कट उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या सतर्कतेमुळे उधळला!

टाकळी हाजी शिरुर प्रतिनिधी ■ शेख शौकत मुजावर



टाकळी हाजी(शिरूर) : शिरुर तालुक्यातीलं ऊघ/व्हिसल ब्लोअर कार्यकर्ते अशोक भोरडे यांच्या गाडीचा पाठलाग करत हत्येचा कट रचल्या प्रकरणी शिक्रापुर पोलिस स्टेशन येथे तीन जणांविरुद्ध अपंग व्यक्तीचे अधिकार अधिनियम २०१६ तसेच इतर विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाला असुन गुन्ह्यात वापरलेली बलेनो कार क्रं एम एच १२ एक्स ई ५१०९ शिक्रापुर पोलिसांनी ताब्यात घेतली आहे.

शिक्रापुर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि ३ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारीं ऊघ/ व्हिसल ब्लोअर कार्यकर्ते अशोक भोरडे हे कुटुंबियांसोबत बाहेरगावी जात असताना हि घटना घडली आहे त्यांनी निमगाव म्हाळुंगी (ता. शिरुर) येथे नियमबाह्य डोंगर उत्खनन चालु असल्याबाबत शिरुरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के तसेच तलाठी आबासाहेब रुके यांच्याकडे तक्रार केली होती.त्याचा राग धरून त्यांच्या गाडीचा पाठलाग करत त्यांची हत्या करण्याचा कट रचला गेला होता.

परंतु अशोक भोरडे यांनी शिरुरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले तसेच बीट अंमलदार किशोर तेलंग यांना फोन केला. तसेच ११२ वर संपर्क साधत घटनेची माहिती दिली.त्यामुळे तातडीने पोलिस घटनास्थळी आले आणि पाठलाग करणारी कार ताब्यात घेतली.त्यामुळे पुढील अनर्थ टळला. भोरडे यांच्या फिर्यादीवरुन अमोल सतिश वडघुले,मयुर शामराव वडघुले,राहुल शंकर करपे सर्व रा.टाकळी भिमा ता.शिरुर जि.पुणे यांच्यावर गुन्हा दाखल झाला.

अशोक भोरडे यांच्या जिवीताला धोका निर्माण झाला असुन त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.भोरडे यांनी यापुर्वीही अनेकवेळा गौणखनिज उत्खनन,वाहतुक आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या तक्रारी केलेल्या असुन त्यांची चौकश्या चालु आहेत. तसेच त्यांनी वेळोवेळी उपोषण, आंदोलन करुन अनेक पिडीत व्यक्तींना न्याय मिळवुन देण्यासाठी ते सतत संघर्ष करत आहेत.त्यामुळे अनेकजण त्यांच्यावर चिडून आहेत. त्यामुळे त्यांच्या जिवीताला धोका निर्माण झाला असुन शासनाने त्यांना पोलीस संरक्षण दयावे अशी मागणी तालुक्यातील काही सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनांनी केली आहे.

जागतिक पाणथळ दिवस व कांदळवन स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरण : महाराष्ट्र शासनाचे कांदळवन विभाग- दक्षिण कोकण अलिबाग - रायगड, कांदळवन प्रतिष्ठान, महाराष्ट्र, वीर वाजेकर कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय फुंडे,उरण व माझी वसुंधरा अभियान ५.०, ग्रामपंचायत बोकडविरा, ग्रुप ग्रामपंचायत नवघर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पाणथळ दिवस व कांदळवन स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले . कांदळवन वन परिमंडळ अधिकारी किशोर सोनवणे व त्यांचा एमएसएफ स्टाफ,कांदळवन प्रतिष्ठानच्या प्रकल्प सहयोगी साईश्वरी व विवेकजी हे तांत्रिक मार्गदर्शनासाठी तसेच निकेतन ठाकूर हे पर्यावरण प्रकल्प समन्वयक ग्रामपंचायत बोकडविरा व फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) चिरनेर उरण संस्थेचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. वीर वाजेकर कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय चे प्रभारी प्राचार्य डॉ आमोद ठक्कर, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख चव्हाण जी डी , डॉ घोडके राज्यशास्त्र विभाग प्रमुख, रसायनशास्त्र विभागाचे वाय ए गायकवाड व डॉ सोनवले एम सी, एनएसएस चे डॉ धिंदले, सी डी विद्यार्थी ,एमएसएफ स्टाफ व उपस्थित सर्वांनी कांदळवन स्वच्छता अभियान मोहिमेत सहभाग घेतला. ग्रुप ग्रामपंचायत नवघरचे सरपंच नितीन मढवी, उपसरपंच विश्वास तांडेल, कुंडेगाव चे अध्यक्ष प्रमोद पाटील आणि बोकडविरा गावाचे उपसरपंच ध्रुव पाटील व सदस्य मिथुन पाटील यांची विशेष उपस्थिती होती. जमा झालेला कचरा घंटागाडी मार्फत गोळा केले गेला. अशा प्रकारचे स्वच्छता अभियान कांदळवन विभागाद्वारे पुढील काळात आयोजित केले जाणार आहेत.गावागावात फिरून कांदळवन क्षेत्रांवर कचऱ्याचा नायनाट करणे व कांदळवन परिसंस्थेस असणारा संभाव्य धोका कमी करणे हे ह्या अभियान मागचा उद्देश आहे असे उपस्थितांनी सांगितले.

नवीन लेबर कोड लागू करताना कामगार हिताची काळजी घेणार: कामगार मंत्री श्री आकाश फुंडकर

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरण: नवीन कामगार कायदे लागू करताना कामगार हिताची काळजी घेणार , तसेच भारतीय मजदूर संघाने घेतलेल्या हरकतींचा पूर्ण विचार करणार असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री श्री आकाश फुंडकर यांनी केले. भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने नवीन लेबर कोड आणि बी एम एस या विषयावर आयोजित सेमिनार मध्ये ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ?डव्होकेट अनिल ढुमणे, महामंत्री किरण मिलगिर, अखिल भारतीय उपाध्यक्ष राज बिहारी शर्मा, क्षेत्र संघटन मंत्री राजेशजी, ना. मे लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या संचालक श्रीमती रोशनी कदम - पाटील आणि प्राध्यापक पी.एम. कडूकर हे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक किरण मिलगिर यांनी केले तर सूत्रसंचालन बाळासाहेब भुजबळ यांनी केले.

नवीन कामगार कायदे २०१९ - २०२० पासून संसदेने पास केलेले असून ते लागू करण्याबाबत केंद्र व राज्य सरकार विचार करीत आहे. या पार्श्वभूमीवर या कायद्यांबाबत भारतीय मजदूर संघाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था परळ यांच्या हॉलमध्ये या सेमिनारचे आयोजन करण्यात आलेले होते.

सेमिनारचे उद्घाटन कामगार मंत्री नामदार श्री आकाश फुंडकर यांनी केले. ?ड अनिल ढुमणे आणि राजबिहारी शर्मा यांनी या कायद्यांबाबत भारतीय मजदूर संघाची भूमिका विशद केली. उपस्थित प्रतिनिधींची प्रश्न उत्तर झालीं. या निमित्ताने ?ड अनिल ढुमणे यांनी लिहिलेल्या 'नवीन लेबर कोड आणि ँश्ए' या पुस्तकाचे प्रकाशन भारतीय श्रमशोध मंडळाच्या वतीने कामगार मंत्र्यांचे हस्ते करण्यात आले. सामाजिक सुरक्षा कोड २०२० आणि वेतन कोड २०१९ हे कामगार कायदे असंघटित आणि संघटित क्षेत्रातील कामगारांच्या साठी लाभदायक असून घरेलू, बांधकाम, अंगणवाडी, आशा, फेरीवाले,रिक्षा,टॅक्सी आदी असंघटित क्षेत्रातील सुमारे ५० कोटी कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि संघटित आणि असंघटित क्षेत्रातील सर्व कामगारांना किमान वेतन हमी देणारे असल्याने ते त्वरित लागू झाले पाहिजे अशी मागणी याप्रसंगी करण्यात आली. तर औद्योगिक संबंध कोड २०२० आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती कोड २०२० या कोड मधील कारखाना बंद करणे, कामगार कपात, ले ऑफ , फिक्स टर्म एम्प्लॉयमेंट, स्टॅंडिंग ऑर्डर आणि कंत्राटी कामगारांशी संबंधित अनेक तरतुदी कामगार विरोधी असून या कोडमुळे औद्योगिक क्षेत्रात असंतोष आणि संघर्ष निर्माण होणार असल्याने त्या तरतुदी बदलून मगच ते कायदे लागू करावेत अशी मागणी भारतीय मजदूर संघाच्या वतीने करण्यात आली.

या सेमिनारला राज्यभरातून संरक्षण, वीज मंडळ, बँका, विमा , अणुऊर्जा , पोस्ट , मध्य रेल्वे , पश्चिम रेल्वे, ँण्इ , पोर्ट ट्रस्ट, खाजगी कारखाने, सार्वजनिक उद्योग, सहकारी बँका, शासकीय कर्मचारी , सिक्युरिटी प्रेस व करन्सी नोट प्रेस,वीज कंत्राटी कामगार, अंगणवाडी, घरेलू, बांधकाम , रिक्षा चालक, फेरीवाले, टॅक्सी चालक, बिडी, मर्चंट नेव्ही, सुरक्षा रक्षक, एअर इंडिया आदी उद्योगातील २५० पेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मुंबईचे सचिव संदीप कदम यांनी केले. सामुहिक वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली.

शिक्षक सेनेच्या राज्य अधिवेशनात घुमणार जुनी पेन्शन चा आवाजः रविराज माधवराव जाधव ; जिल्हा समन्वयक शिक्षक सेना नांदेड

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार : महाराष्ट्र राज्य शिक्षक नांदेड यांच्या वतीने जुनी पेन्शन, वरिष्ठ वेतन श्रेणी, वेतनवाढ,थकीत वेतन आयोग हफ्ता, नियमित पगार, वस्ती शाळा शिक्षक मूळ सेवा ग्राह्य, वैद्यकीय बील यासाठी १३ जून २०२५ रोजी जोरदार आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे राज्य अधिवेशन मुलुंड - मुंबई येथे सोमवार, दिनांक १०/०२/२०२५ रोजी होत आहे. सदर अधिवेशनात महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे प्रांताध्यक्ष तथा मुंबई शिक्षक मतदार संघाचे आमदार ज.मो. अभ्यंकर साहेबांमार्फत जुनी पेन्शन योजना याबाबत जोरदार आवाज विधानसभा सभागृहात उठवावा. यासाठी शिक्षक सेना राज्य अधिवेशनात हा मुद्दा पक्षप्रमुख शिवसेना माननीय उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या समक्ष भूमिका शिक्षक सेना नांदेडच्या वतीने मांडण्यात येणार आहे. आजपर्यंत शिक्षक सेनेच्या मागण्या पूर्ण करण्याकरिता शिवसेनेच्या वतीने शिक्षक सेने सोबत सर्वतोपरी सहकार्य केलेले आहे. आणि यापुढेही शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यास आग्रही राहील अशी भूमिका शिक्षक सेनेचे यापुढे असेल श्री. विठू भाऊ चव्हाण राज्य उपाध्यक्ष मांडण्यात आली आहे. यांच्या वतीने महाराष्ट्र शिक्षक राज्य शिक्षक सेना अधिवेशनासाठी नांदेड जिल्हा अध्यक्ष श्री. संतोष अंबुलगेकर सर, शिक्षक सेना नांदेड,जिल्हा परिषद शिक्षण विभाग,परशुराम येसलवाड अध्यक्ष, शिक्षक सेना नांदेड, श्री. तानाजी पवार जिल्हा अध्यक्ष खाजगी नांदेड श्री. रवि बंडेवार जिल्हा सरचिटणीस, शिक्षक सेना नांदेड, गंगाधर कदम कार्याध्यक्ष,शिक्षक सेना नांदेड,अविनाश चिद्रवार, महेश गोविंदवार, श्री. सचिन गायकवाड, श्री प्रकाश कांबळे जिल्हा संघटक, श्रीम.सुकन्या खांडरे मॅडम अध्यक्षा, शिक्षक सेना महिला आघाडी, श्रीम.शिवकन्या पटवे सचिव, महिला आघाडी, प्रकाश फुलवरे अध्यक्ष,शिक्षक सेना, नांदेड, बालाजी गेंदेवाड अध्यक्ष, शिक्षक सेना बिलोली संभाजी पवार अध्यक्ष, शिक्षक सेना लोहा, गोविंद आलेटवाड अध्यक्ष, शिक्षक सेना देगलुर श्री.प्रल्हाद केंद्रे, अध्यक्ष, शिक्षक सेना माहूर श्री. दिलीप पांचाळ तालुका अध्यक्ष,कंधार , श्री.आनंदा सुर्यवंशी तालुका अध्यक्ष, उमरी, धनाजी मुंडकर, शिवराज पाटील, सतीश वाघमारे, ज्ञानेश्वर येंजणे सर, आश्विन वाघमारे, अमोल सुर्यवंशी, धम्मकिरण कोकणे, विजय शिंगारपुतळे, संदीप गायकवाड, मोमीन सर, असिफ सर, राहुल ढवळे, कपिल कावळे, भगवान गायकवाड, श्याम आवळे, शिवराज सोमवारे , अजित पाटील तालुकाध्यक्ष भोकर, प्रमोद देशमाने तालुका सरचिटणीस, देविदास जमदडे, दत्ता पेंढारकर, सोनटक्के सर, कदम सर, गणेश कोठुळे, रामदास इंदुरे तालुका संघटक, राजाराम कसलोड तालुका सरचिटणीस शिवराज गागीलगे, इरेशाम झंम्पलकर यांनी मेहनत घेतली आहे.

खो-खो खेळाडू साहिल चिखलेची मुंबई पोलीस दलात नियुक्ती

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : पिंपरी दुमाला तालुका शिरूर येथील शेतकरी कुटुंबातील अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपल्या आई वडिलांच्या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेऊन आपल्या अलौकिक कर्तुत्वाचा ठसा उमटवून कुमार साहिल ललिता सोमनाथ चिखले या युवकाने आपली माती क्रीडा प्रबोधनी मधून संघर्षाचा पाया रचला आणि खो खो हा खेळ राष्ट्रीय पातळी वर खेळून अनेक सन्मान मिळवले आणि कालच खो-खो या खेळाच्या माध्यमातून मुंबई पोलीस हवालदार या पदावर नियुक्ती झाल्याने साहिल व त्याचे आई-वडील कुटुंबीय नातेवाईक ग्रामस्थ यांना आनंदाला पारावारा उरला नाही या बातमीने आई आणि वडिलांचे आनंदाश्रू अनावर झाले. पुत्र व्हावा गुंडा त्याचा तीही लोकी झेंडा या संत तुकाराम महाराजांच्या वाणीने प्रसिद्ध असणाऱ्या ओवीने साहिलचे झालेली निवड खरोखरच सर्वांना प्रेरणा देणारी आहे. साहिल चिखले चा प्रवास अतिशय थक्क करणार आहे. काही वर्षांपूर्वी मुंबई या शहरातून गावाकडे आपली शेती सांभाळण्यासाठी आलेले चिखले दापत्यानी आपल्या काळया आईची सेवा करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असताना अनेक कौटुंबिक अडीअडचणीचा सामना करून आपला प्रपंच केला वेळप्रसंगी मिळेल तिथे काम करून आपल्या दोन्ही मुलांना मोठा मुलगा अनिकेत व लहाना मुलगा साहिल यांना गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षणाचे धडे दिले त्यानंतरचे शिक्षण वाघाळे येथील रयत शिक्षण संस्थेचे कालिका माता विद्यालय वाघाळे या ठिकाणी दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले तिथे त्यांना खो-खो चे प्रशिक्षक धीरज दंडवते सर यांचे खो-खो या खेळाबद्दल चे मार्गदर्शन लाभले त्या खेळाच्या माध्यमातून त्यांनी शालेय खो-खो स्पर्धा त्यानंतर तालुका पातळीवरील तसेच जिल्हा पातळीवरील खो खो खेळाची चमक दाखवल्यानंतर अनिकेत आणि साहिल यांची राज्याच्या खोखो स्पर्धेमध्ये निवड झाली त्याही ठिकाणी त्यांनी आपल्या मेहनतीच्या व आत्मविश्वासाच्या जोरावर अनेक पदके मिळवली हे सर्व होत असताना त्यांच्या आई-वडिलांनी आपल्या मुलांना कोणतीही कमी पडू नये म्हणून कशाचीही परवा न करता मिळेल ते काम करून अहोरात्र कष्ट केले व आपल्या मुलांना आर्थिक मदत करत राहिले अनेक वेळा आर्थिक अडचणीचा सामना त्यांना करावा लागला हा सामना करत असताना आपल्या कुटुंबामध्ये स्वतःच्या पोटाला चिमटे घेऊन आपल्या मुलांना कोणतीही उणीव भासू दिली नाही. याची जाण ठेवून अनिकेत आणि साहिल यांनी पोलीस भरतीसाठी प्रयत्न केले अखेर साहिलला या प्रयत्नात यश आले येणाऱ्या भविष्यकाळात लवकरच अनिकेत पण लवकरच उंच भरारी घेऊन शासकीय पदावर जाण्याची त्याची पुरेपूर इच्छा आहे जशी साहिलने आपल्या आई वडिलांची इच्छा पूर्ण केली तशीच इच्छा येणाऱ्या काळात अनिकेत पण पूर्ण करणार असल्याचा मानस त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. या निवडीने पिंपरी दुमाला व परिसरामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे

शाश्वत विकासासाठी गाव तिथे तलाव गरजेचे

रिधोरा येथे जाम प्रकल्प असूनदेखील रिधोरा बोरखेडी व आजूबाजूची गावे ड्रायझोन मध्येच शेतकरी सिंचन विहिरीच्या सरकारी पात्रतेतून बाहेर; एकतीस वर्ष तलाव बेंडून पाणी मुरते कुठे

काटोल ■ प्रशांत पवार



काटोलः काटोल/नरखेड तालुक्यात कोट्यावधी रुपयांची उधळण करूनही तालुक्यातील अर्ध्यापेक्षा अधिक गावे डार्क झोन मधेच आहेत. काटोल/नरखेड डार्क झोन मधून बाहेर काढण्यासाठी भ्रष्टाचार विरहित ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. आता आमदार चरणसिंग ठाकूर यांनी उच्चस्तरी बैठक घेऊन भ्रष्टाचार विरहित अधिकारी/पदाधिकारी यांचे देखरेखी समीती बनवून काटोल/नरखेड/ क्षेत्र डार्क झोन मधून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करावा.

हवामान बदल आणि स्थानिक कारणांमुळे जगातील अनेक देशांच्या अन्नधान्य उत्पादनात घट होत आहे. भारतीय कृषी व्यवस्थेसाठी ही मोठी संधी आहे. तिचा फायदा घेण्यासाठी गावपातळीवर सिंचनाचे नियोजन करावे लागेल. 'गाव तिथे तलाव'च्या माध्यमातून येत्या पावसाळ्यापूर्वी गावोगावी सिंचनाच्या सोयी केल्या, तर कदाचित आपल्याला कृषी अर्थकारणातून शाश्वत विकास साधण्याच्या बाबतीत जगासमोर आदर्श उभा करता येईल.

जगभरातील उद्योग मंदीच्या छायेत आहेत. त्यामुळे भारतीय औद्योगिक क्षेत्रही 'उणे' विकास दाखवत आहे. अशा स्थितीत आपल्या देशातील कृषी अर्थव्यवस्थेने अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीवर मात करत २०२२ च्या चौथ्या तिमाहीमध्ये ४.१ टक्के इतका विकासाचा दर गाठून अर्थतज्ज्ञांनाही सुखद धक्का दिला आहे. एवढेच नव्हे, तर कृषी क्षेत्राच्या या सकारात्मक वाटचालीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेलाही आश्वस्त केले आहे. वास्तविक भारतीय अर्थव्यवस्थेतील अर्ध्यापेक्षा जास्त रोजगाराच्या संधी आजही कृषी अर्थव्यवस्थेतून निर्माण होत आहेत. मात्र, भारतासारख्या प्रचंड मोठ्या लोकसंख्येच्या देशात एवढी मोठी रोजगाराची संधी निर्माण करणाऱ्या कृषी अर्थव्यवस्थेकडे राजकारणी मंडळी आणि प्रशासनाने कमालीचे दुर्लक्ष केले आहे. म्हणूनच देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेची प्रचंड मोठी क्षमता असतानाही भांडवल आणि साधनांची वानवा असल्याने त्यातून उत्पादनासोबतच दरडोई उत्पन्न आणि रोजगाराचे ईप्सित साधता आलेले नाही. कृषी क्षेत्रातील नियोजन आणि व्यवस्थापनाच्या बाबतीत देशातील राजकीय व प्रशासकीय नेतृत्व अत्यंत बेफिकिरीने दुर्लक्षाचे धोरण राबवत आले आहे. उदाहरणार्थ - सिंचन हे कृषी क्षेत्राचा प्राण मानले जाते. मात्र, महाराष्ट्रातील सिंचनाचे प्रमाण जेमतेम १८ टक्के आहे. विदर्भात तर ते ६ टक्के आणि पश्चिम विदर्भ म्हणजे जिथे सर्वात जास्त आत्महत्या होतात, तिथे फक्त ४ टक्के सिंचन आहे.

या पार्श्वभूमीवर नव्या वर्षात कृषी क्षेत्राच्या क्षमतेचा परिपूर्ण वापर करून घेण्यासाठी सिंचनाकडे प्राधान्याने लक्ष द्यावे लागेल. मोठ्या प्रकल्पांपुढच्या अडचणी आणि ते पूर्ण होण्यासाठी लागणारा विलंब पाहता सिंचनाकरिता छोटे छोटे, पण शाश्वत असे पर्याय शोधावे लागतील. त्या दृष्टीने गावोगावी लहान-मोठे तलाव निर्माण करण्याचे अभियान राबवता येईल. अशा तलावांमधून स्थानिक पातळीवर सिंचनाचा प्रश्न सुटू शकतो. लोकसंख्या आणि कृषी व छोट्या उद्योगांच्या पाणी मागणीनुसार प्रत्येक गावात येत्या पावसाळ्याआधी लहान-मोठे तलाव तयार केले, तर महाराष्ट्रापुढची पाण्याची समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होऊ शकेल. शेतीतील उत्पादन वाढून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात तर वाढ होईलच; शिवाय आपली कृषी अर्थव्यवस्था मंदीच्या काळातही भारतीय मजुरांना उपाशी मरू देणार नाही. खरे तर भारताची भौगोलिक स्थिती इतकी सकारात्मक आहे, की जेव्हा बहुतांश प्रगत देश बर्फवृष्टी आणि हिमाच्छादनाचा सामना करत असताना आपल्याकडे मात्र शेतीसाठी मात्र तुलनेने अत्यंत चांगले वातावरण असते. भरघोस उत्पादनासाठी कमी असते ती फक्त सिंचनाच्या पाण्याची. त्यामुळे राज्य आणि केंद्र शासनाने 'गाव तिथे तलाव' ही संकल्पना राबवली तर निश्चितच देशाची धान्यरूपी संपत्ती मोठ्या प्रमाणात वाढेल. त्याच वेळी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतील. कृषी क्षेत्रातील नियोजन आणि व्यवस्थापनाच्या बाबतीत देशातील राजकीय व प्रशासकीय नेतृत्व अत्यंत बेफिकिरीने दुर्लक्षाचे धोरण राबवत आले आहे. उदाहरणार्थ - सिंचन हे कृषी क्षेत्राचा प्राण मानले जाते. मात्र, महाराष्ट्रातील सिंचनाचे प्रमाण जेमतेम १८ टक्के आहे. विदर्भात तर ते ६ टक्के आणि पश्चिम विदर्भ म्हणजे जिथे सर्वात जास्त आत्महत्या होतात, तिथे फक्त ४ टक्के सिंचन आहे.

या पार्श्वभूमीवर नव्या वर्षात कृषी क्षेत्राच्या क्षमतेचा परिपूर्ण वापर करून घेण्यासाठी सिंचनाकडे प्राधान्याने लक्ष द्यावे लागेल. मोठ्या प्रकल्पांपुढच्या अडचणी आणि ते पूर्ण होण्यासाठी लागणारा विलंब पाहता सिंचनाकरिता छोटे छोटे, पण शाश्वत असे पर्याय शोधावे लागतील. त्या दृष्टीने गावोगावी लहान-मोठे तलाव निर्माण करण्याचे अभियान राबवता येईल. अशा तलावांमधून स्थानिक पातळीवर सिंचनाचा प्रश्न सुटू शकतो. लोकसंख्या आणि कृषी व छोट्या उद्योगांच्या पाणी मागणीनुसार प्रत्येक गावात येत्या पावसाळ्याआधी लहान-मोठे तलाव तयार केले, तर महाराष्ट्रापुढची पाण्याची समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होऊ शकेल. शेतीतील उत्पादन वाढून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात तर वाढ होईलच; शिवाय आपली कृषी अर्थव्यवस्था मंदीच्या काळातही भारतीय मजुरांना उपाशी मरू देणार नाही. खरे तर भारताची भौगोलिक स्थिती इतकी सकारात्मक आहे, की जेव्हा बहुतांश प्रगत देश बर्फवृष्टी आणि हिमाच्छादनाचा सामना करत असताना आपल्याकडे मात्र शेतीसाठी मात्र तुलनेने अत्यंत चांगले वातावरण असते. भरघोस उत्पादनासाठी कमी असते ती फक्त सिंचनाच्या पाण्याची. त्यामुळे राज्य आणि केंद्र शासनाने 'गाव तिथे तलाव' ही संकल्पना राबवली तर निश्चितच देशाची धान्यरूपी संपत्ती मोठ्या प्रमाणात वाढेल. त्याच वेळी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतील.

आज अमेरिकेसारखे बलवान देशही हिमवादळामुळे (आर्क्टिक ब्लास्ट) कृषी क्षेत्रातून एका पैचीदेखील संपत्ती निर्माण करू शकत नाहीत. बर्फामुळे उत्तर गोलार्धातील बहुतांश देशांची स्थिती आज जवळपास सारखीच आहे. परिणामी तेथील अन्नधान्य उत्पादनात मोठी घट होत आहे. या जागतिकीकरणाच्या काळात भारतीय कृषी व्यवस्थेसाठी ही मोठी संधी आहे. तिचा फायदा घेण्यासाठी आपले राज्यकर्ते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी त्याकडे डोळसपणे बघायला हवे. महाराष्ट्रात 'गाव तिथे तलाव'च्या माध्यमातून येत्या पावसाळ्यापूर्वी गावोगावी सिंचनाच्या सोयी केल्या, तर कदाचित आपले राज्यही कृषी अर्थकारणातून शाश्वत विकास साधण्याच्या बाबतीत जगासमोर आदर्श उभा करेल.

शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि सकस अन्न या भारतीयांसाठी महत्त्वाच्या मूलभूत गरजा आहेत. आजदेखील केंद्र शासनाला ८१ कोटी भारतीयांना मोफत धान्य वितरण करावे लागते. याचाच एक अर्थ असा की, आपल्या कुटुंबासाठी धान्य विकत घेता येईल, एवढादेखील रोजगार भारतातील जवळपास दोनतृतीयांश लोकांना मिळत नाही. त्यामुळे दिखाव्याच्या 'कर्जाऊ' विकासापेक्षा सिंचनाच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशाला शाश्वत विकासाकडे नेता येईल. आज शेतकरी आत्महत्या थांबवण्याबरोबरच कष्टकऱ्यांना फुकटच्या धान्याच्या लांछनापासून वाचवण्याची गरज आहे. त्यासाठी तलावांसारख्या सिंचनाच्या उपाययोजना अत्यंत प्रभावी ठरू शकतात. उन्हाळ्यात गावोगावी पाण्यासाठी होणारी वणवण थांबवतानाच हवामान बदलाच्या काळात आणि बदलत्या वैश्विक आर्थिक वातावरणात खंबीरपणे पाय रोवून उभे राहायचे असेल, तर शासनाने 'गाव तिथे तलाव' हा नवीन वर्षाचा संकल्प म्हणून राबवला पाहिजे.

धरण परीसरातील मृतदेहाचा झाला उलगडा; दरड कोसळल्याने दुर्गादास नेहारे चा मृत्यु



लहान आर्वी ■ सुनिल साबळे



पोलीस तपासात प्रकरणाचा उलगडा ; स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन तासात केला उलगडा ; दोन संशयित ताब्यात ; जानेवारी रोजी अप्पर वर्धा धरण परिसरात मृतदेह फेकून केला पोबारा

लहान आर्वीः आष्टी ते मोर्शी मार्गावर अप्पर वर्धा धरणाच्या परिसरात दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता एका व्यक्तीचा तुटलेला हात आष्टी वनविभाग येथील बिटगार्ड चन्द्रशेखर शेंडे यांना दिसताच व शेजारी अर्धवट शरीर, मानवी कवटी दिसताच एकच खळबळ उडाली होती. मुतकच्या खिश्यात असलेले पॉकेट व त्यात आधार कार्ड वरून ओळख पटवीत मुतक दुर्गादास पांडुरंग नेहारे वय २७ राहणार मायवाडी तालुका मोर्शी जि.अमरावती असे चौकशी अंती निष्पन्न झाले.घटना स्तळं गाठल्यावर हत्या झाल्याचा अंदाज व्यक्त होत होता मात्र स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपासाची चक्रे वेगात फिरवून प्रकरणाचा दोन तासात उलगडा केला.

सविस्तर असे कि, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील मायवाडी येथील भूमिहीन शेतमजूर दुर्गादास पांडुरंग नेहारे हा मजुरीचे काम करीत असताना तो गावाशेजारी असणाऱ्या माळू नदीत वाळू (रेती)काढण्यासाठी ट्रॅक्टर वर कामाला जात होता. सोबत ट्रॅक्टर चालक व एक मजूर सोबतीला होते.दि. ६ जानेवारी रोजी सकाळी सहा वाजता रेती काढीत असताना दुर्गादास च्या अंगावर नदीची दरड कोसळली त्यात तो दबला आणि जाग्यावर मरण पावला. सोबत असलेल्या दोघांना प्रकरण आपल्या अंगावर येईल अशी भीती वाटू लागली. म्हणून सोबत असलेल्या दोघांनी मूतदेह रात्री ८ वाजेपर्यंत रेतीत दाबून ठेवला आणि दि. ६ जानेवारी च्या रात्री दहा वाजता दुचाकीवर मधोमध बसवून अप्पर वर्धा धरण परिसर गाठलं. रात्री चे अकरा वाजता मूतदेह एका झुडूपात फेकून दिला आणि गावाकडे पोबारा केला.अशी माहिती संशयित आरोपी दोघांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना विचारपूस करताना दिली.

दुसरीकडे वडील पांडुरंग नेहारे मुलगा दिसत नाही शोध घेत मोर्शी पोलीस स्टेशन येथे पोहचले तेथे मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार दिली.

दि. ८ जानेवारी रोजी अप्पर वर्धा धरण परिसरात एका व्यक्तीची हत्या झाली ही वार्ता जिल्हा पोलिसांना कळताच वर्धा येथून अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. सागर कवडे, उपविभागीय पोलीस अधिकारी मकेशवर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चोधरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश भोयर हे सर्व अधिकारी घटना स्तळावर पोहतचाच चौकशी करायला प्रारंभझाला. अवघ्या दोन तासात प्रकरणाचा उलगडा झाला. संशयित आरोपी हे मूतदेह पाहायला घटना स्तळावर आले होते. पोलिसांनी वेगात चक्रे फिरवून दोन तासात दोन संशयितना ताब्यात घेउन प्रकरणाचा उलगडा केला. मुतक दुर्गादास पांडुरंग नेहारे यांचा मुर्त्यू हा दर्डीखाली दबून झाला अशी माहिती पोलिसांना प्राप्त झाली. दोन संशयित आष्टी पोलिसांच्या ताब्यात असून कसून चोकशी सुरु आहे. प्रकरणात मर्ग दाखल झाला असून पुढील तपास सुरुवातीला आहे. प्रकरणात मोलाची कामगिरी बजावरणारे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक उमाकांत राठोड, पोलीस उपनिरीक्षक अमोल लागट, आष्टी पोलीस उपनिरीक्षक गजानन बावणे, विनायक घावट, विष्णू काळुसे, शेखर डोंगरे, शुभम राऊत, हमीद शेख, राजेश तिवास्कर, विकास मुने, सुगम चौधरी, मुकेश ढोके, प्रवीण बंडवल, सचिन ढाले, सुरज राठोड, पोलीस उपनिरीक्षक डी. जी. पाळणाते, चालक अखिलेश इंगळे आदी कर्मचारी हजर होते.

परीक्षा केंद्रावर कॉपी करताना दिसल्यास पर्यवेक्षक व विद्यार्थ्यांवर कारवाई होणार : गटशिक्षणाधिकारी प्रमोद देशपांडे

आष्टी (श)वर्धा ■ सुनिल मांडवे



आष्टी (शहीद) : माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२५ लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयात दिनांक १०/०२/२०२५ रोज सोमवार संबंधित कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यात आली या बैठकीत शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे वाचन करून दाखविले विद्यार्थी कॉपी करताना आढळल्यास त्या विद्यार्थ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येणार असून त्या वर्गावर असलेला संबंधित शिक्षक याला सुद्धा जबाबदार धरण्यात येईल असे स्पष्ट संकेत गटशिक्षण अधिकारी श्री प्रमोद देशपांडे यांनी दिले त्याचप्रमाणे कस्टडीयम परिरक्षक श्री गजानन पुरी यांनी केंद्र संचालकांनी कामात हयगय काय केल्यास यांना जबाबदार ठरवून कारवाई करण्यात येईल परीक्षा सुरू असलेल्या केंद्रभोवताल कुणाकडे मोबाईल आढळल्यास किंवा कर्तव्यावर असताना मोबाईल पाहताना दिसल्यास त्यांच्यावरही नियमानुसार कारवाई होणार आहे असे स्पष्ट संकेत दिले आहे यावेळी व्यासपीठावर लोकमान्य विद्यालयाचे प्राचार्य श्री विजय दाभाडे, गटशिक्षणाधिकारी श्री प्रमोद देशपांडे, केंद्रप्रमुख श्री गजानन पुरी केंद्र क्रमांक ५१७ चे केंद्र संचालक श्री नागलिया उपस्थित होते

श्री संजय चापले, राधेश्याम कलंत्री सोहराब खान, सुनील मांडवे, युवराज निशिदकर नंदू रेवस्कर यांनी सहकार्य केले

आमदार राजेश बकाने यांची ग्रामस्थांसी चहा पे चर्चा



देवळी ■ सौ.आरती गोसटकर/कारंजेकर

देवळी : देवळी पुलगाव मतदारसंघातील नवनिर्वाचित आमदार राजेश बकाने यांनी अल्लीपुर गावात विकास कामाचे भूमिपूजन केले. व भूमिपूजनानंतर आठवडी बाजारात असलेल्या तोसीफ पठाण यांच्या चहा कॅन्टीनला भेट देऊन गावातील नागरिकांशी संवाद साधून गावातील समस्या जाणून घेतल्या.व गावातील नागरिकांसोबत चहा घेऊन समस्याचे निराकरण करण्याचे आश्वासन दिलेत. चहा विक्रेता तोसीफ पठाण यांच्या बाबत आस्थेने विचारपूस करण्यात आली. या प्रसंगामुळे परिसरातील सर्व सामान्य मतदारांनी आमदार राजेश बकाने यांचेशी हितगुज केले. आमदार महोदय या भागातील रस्त्याची शेतमजूर, शेतकरीवर्गाची समस्यांचे निराकरण करेल अशी आशा व्यक्त केली.

आदर्श एकता सामाजिक संघटना महा. राज्य तर्फे पोट्रोल मध्ये भेसड झाल्याने मा. हरीश काळे साहेब तहसीलदार आर्वी यांच्या मार्फतमा.प्रेट्रोल मंत्रालय भारत सरकार यांना निवेदन

आर्वी ■ प्रतिनिधी



आज दिनांक १०-०२-२०२४ रोज सोमवार ला मा.हरीश काळे साहेब तहसीलदार आर्वी यांच्या मार्फत मा. श्री. हरदीप एस पुरी साहेब मंत्री जी पेट्रोलियम व प्राकृतिक गॅस केंद्रीय मंत्री दिली यांना निवेदन पाठवण्यात आले आर्वी वर्धा या ठिकाणी गेल्या आठ दहा दिवसापासून भेसळ युक्त पेट्रोल आल्याने लोकांना त्यांचा खूब त्रास सहन करावा लागला या माध्यमातून लोकांची पैश्याची लूट पेट्रोल विक्रेत्या कंपनी तर्फे झाली. ज्या दुचाकी गाडी दुरुस्ती करणारे कारागीर गाडी पुन्हा पुन्हा येत असल्याने त्यांना सुद्धा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. या भेसळ युक्त पेट्रोल मुळे दुचाकी गाड्या ?टोमॅटिक रेस होत आहे. या मुळे असिसिडेन्ट चे प्रमाण वाढाची शक्यता आहे. बऱ्याच गाड्याचे इंजिन मध्ये प्रॉब्लेम झाले. त्या मुळे नोक तिथे लोकांना पैश्याचा चुराडा झाला याला जबाबदार कोण सरकारने या नंतर असे होऊ नय याची दक्षता घ्यावी अनेथ्या आदर्श एकता सामाजिक संघटना महा राज्य तर्फे अंदोलन करण्यात येईल.

ब्लूज़ स्पोर्ट्स अकादमी ४५ पदकांसह प्रथम स्थानावर किंवा पंढरपूर राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ब्लूज़ स्पोर्ट्स अकादमीच्या ३० ॲथलिट्सची निवड

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा, ०८-०९ फेब्रुवारी २०२५-वर्धा जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय सब-ज्युनियर मैदानी स्पर्धेचा यशस्वी समारोप झाला. ही स्पर्धा ०८ फेब्रुवारी ते ०९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत वर्धा पोलिस मुख्यालयात पार पडली. या स्पर्धेत संपूर्ण जिल्ह्यातील युवा ?थलिट्सनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि उत्कृष्ट कामगिरी केली.

या स्पर्धेत ३०० मीटर, १०० मीटर, ८० मीटर, ६० मीटर, ५० मीटर धावणे, गोळा फेक, लांब उडी अशा विविध स्पर्धांमध्ये 'द ब्लूज़ स्पोर्ट्स अकादमी, वर्धा'च्या ?थलिट्सनी एकूण ४५ पदके जिंकून आपली गुणवत्ता सिद्ध केली.

'द ब्लूज़ स्पोर्ट्स अकादमी, वर्धा'च्या ज्युनियर ?थलिट्सनी आपल्या दमदार कामगिरीने प्रेक्षक आणि परीक्षकांची वाहवा मिळवली. या स्पर्धेत इंद्रा ठाकरे, प्रशब्दी, इशिता अविनाश भगत, प्रतीक सिंग, तृषा, माही मेहरे, ध्रुव, नारायणी मनोज झाडे, आर्या अवचट, निहार, अनन्या, अमोल लाडे, अनुश्री मनोज टिचकुले, अर्णव उमेश डहाके, गुंजन सुनील रोहनकर, कुलभूषण विनोद लोखंडे, निधी, निहार शेलके, निवेदिता, राधिका सवालीकर, रजत, राघव विजय वैरागडे, राज किरण गौरखेडे, रेहान आशीष बीडबाईक, शौर्य तडस, स्वरूप प्रवीण मोहर्ले, तनिष्क श्रीकांत धोटे या खेळाडूंनी १५ सुवर्ण, १६ रौप्य आणि १४ कांस्य पदकांची कमाई करत उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन केले. अनेक खेळाडूंनी तीनपेक्षा जास्त पदके जिंकून आपली चमकदार कामगिरी सिध्द केली.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रतिष्ठा, प्रयाग श्रवण राठोड, देवर्ष जय राजेश अरोरा, यशवर्धन सिंग बघेल, लोमेश सुमित सांवले आणि इतर अनेक ?थलिट्सनीसुद्धा उत्कृष्ट मेहनत आणि जिद्द दाखवली.

'द ब्लूज़ स्पोर्ट्स अकादमी, वर्धा'च्या खेळाडूंच्या उत्कृष्ट प्रदर्शनामध्ये प्रशिक्षक सुनील रोहनकर, आशीष बीडबाईक, विजय वैरागडे, प्रवीण मोहले, सौ. राधा मुळे आणि पालकांचे मार्गदर्शन प्रेरणादायी ठरले.

वर्धा जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव बुटे सर यांनी या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आनंद व्यक्त केला आणि विजयी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. त्यांनी असेही सांगितले की, अशा प्रकारच्या स्पर्धा युवा ?थलिट्सना पुढे जाण्याची संधी देतात आणि भविष्यात अशा स्पर्धांना अधिकाधिक प्रोत्साहन दिले जाईल.

उल्लेखनीय बाब म्हणजे हे सर्व विजयी खेळाडू २२-२३ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या 'पंढरपूर राज्यस्तरीय सब-ज्युनियर मैदानी स्पर्धेत' आपली प्रतिभा सादर करणार आहेत. या स्पर्धेतील त्यांच्या उत्कृष्ठ कामगिरीमुळे वर्धा जिल्ह्याच्या खेळाच्या भविष्याकडे सकारात्मक वाटचाल झाली आहे

नागपुर जिल्हा स्वस्त धान्यस्वस्त धान्य दुकानदारांचे आमदार चरण सिंग ठाकूर यांना निवेदन



काटोल ■ प्रशांत पवार

काटोल : स्वस्त धान्य दुकानदारांचे समस्यांचे निराकरण करण्यात यावे. प्रतिक्विंटल तीनशे रुपये याप्रमाणे कमिशनमध्ये वाढ करण्यात यावी. गोदामातून आलेल्या मालाची पावती देण्यात यावी. सर्वांची व्यवस्था करण्यात यावी. स्वस्त धान्य दुकानदाराचा मृत्यू झाल्यास त्याचा वारसदारांना दुकान वर्ग करण्यात यावे. ई केवायसी चा मोबदला देण्यात यावा गोदामात धान्य तुटीची तरतूद आहे तर स्वस्त धान्य दुकानदारांना सुद्धा तूट भरपाई देण्यात यावी अनेक वर्षापासून स्वस्त धान्य दुकानदारांच्या मागण्या शासन दरबारी थंड बस्त्यात पडलेल्या आहे त्यामुळे शासकीय धोरणाबद्दल स्वस्त धान्य दुकानदारांमध्ये नाराजी असून यावर लवकरात लवकर तोडगा काढावा अशी विनंती आमदार चरण सिंग ठाकूर यांच्यामार्फत स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे कार्याध्यक्ष चंद्रशेखर चिखले व इतर सदस्यांमार्फत रविवारी निवेदन देऊन सरकारला करण्यात आली. दुकानदार संघटनेचे कार्याध्यक्ष चंद्रशेखर चिखले, सहसचिव नरेंद्र साळुंके, सदस्य राजुभाऊ मक्कड, सतीश रेवतकर, बबलु बराडे, व इतर या संदर्भात नागपुर चे जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर यांचेशी फोनवरुन चर्चा करुन समस्या सोडविण्यात येईल असे जिल्हाधिकारी यांनी सांगीतले.

श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (प्रथम) बहुउद्देशीय स्मारक प्रतिष्ठान आणि महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टच्यावतीने नागपूर येथे राजरत्न पुरस्कार १४ फेब्रुवारी रोजी

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (प्रथम) बहुउद्देशीय स्मारक प्रतिष्ठान आणि महाराजा ऑफ नागपूर ट्रस्ट च्या वतीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तींची निवड केली होती. आणि त्यांना 'राजरत्न पुरस्कार' देऊन येत्या १४ फेब्रुवारी रोजी, राजरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाईल. अशी माहिती यावेळी दिली. सर्व स्तरावरून पूर्ण पाठिंबा दिल्यामुळे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या अनेक नोंदी आमच्या आस्थापनेपर्यंत पोहोचल्या. संस्थेने ठरवलेल्या मानकांच्या आधारे, १४ फेब्रुवारी रोजी समिती कडून ६ व्यक्ती आणि १८ वर्षाखालील २ मुलांना सन्मानित केले जाईल. राजरत्न पुरस्कार शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता. सिनीयर भोसला पॅलेस महाल नागपूर येथे सन्मानित होण्यासाठी महाराष्ट्रातील पत्रकारिता / माध्यम क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल आमच्या संस्थेकडून प्रवीण लोणकर (नागपूर) यांना साहित्य आणि इतिहास क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (प्रथम) स्मृती पुरस्काराने सन्मानित केले जाईल. पांडुरंग बलकवडे (पुणे) यांना श्रीमंत राजे मुधोजी महाराज उर्फ ??अप्पासाहेब भोसले (द्वितीय) स्मृती पुरस्कार, पद्मश्री मुरलीकांत राजाराम पेटकर (सांगली) यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल श्रीमंत राजे बहादूर रघुजी महाराज भोसले (चौथा) स्मृती पुरस्कार, पत्रकारिता क्षेत्रातील छायाचित्रकार आणि कॅमेरामन म्हणून उत्कृष्ट कामगिरीबद्दल वरदराज भोसले (कोल्हापूर) यांना श्रीमंत राजे बहादूर फत्तेसिंग महाराज भोसले स्मृती पुरस्काराने सन्मानित केले जाईल. सुरेश उर्फ ??छोटू वैतागे (नागपूर) यांना विशेष कार्यासाठी श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले उर्फ ??चिमणाबापू स्मृती पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहेत. रुपकिशोर कनोजिया (नागपूर) यांना श्रीमंत राजे बहादूर अजितसिंग महाराज भोसले स्मृती पुरस्काराने सन्मानित केले जाईल. त्याचप्रमाणे, १८ वर्षाखालील मुलांच्या क्रीडा क्षेत्रात, कु.तन्वी सुखदेव धुर्वे (नागपूर) यांना श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज भोसले स्मृती पुरस्काराने सन्मानित केले जाईल. विशेष कामासाठी मल्हार अमित महाडिक (नागपूर) यांना श्रीमंत महाराणा प्रताप स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष पी.पी. आचार्य स्वामी श्री. जितेंद्रनाथ महाराज (श्रीनाथपीठाधीश्वर, श्री देवनाथ मठ, सुर्जी अंजनगाव, जिल्हा अमरावती), कार्यक्रमाचे उद्घाटन अ?ॅड. आशिष शेलार (विज्ञान आणि तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य), कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अ?ॅड. अभिजित वंजारी आणि प्रमुख उपस्थिती श्रीमंत राजे रघुजी भोसले (पाचवे), अध्यक्ष, भोसले फाउंडेशन उपस्थित राहतील. या पत्रपरिषदेत उपस्थित असलेल्या भोसले फाउंडेशन आणि राजरत्न पुरस्कार समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांची यादी निमंत्रण पत्रिकेत दिलेली आहेत. असे पत्रपरिषदेत राजरत्न पुरस्कार समितीचे अध्यक्ष राजे मुधोजी भोसले यांनी पत्रकारांना सांगितले. त्यावेळी मंचावरील श्रीमंत युवराज जयसिंगराजे भोसले उपस्थित होते.

सावळी सदोबात खाजगी भंगार वाहनांचा सुळसुळाट - नागरिकांचा जीवघेणा प्रवास

आर्णी ■ धनराज पवार



आर्णी तालुक्यातील सावळी सदोबा या ग्रामीण भागातील गावात दिवसेंदिवस खाजगी भंगार प्रवासी वाहनांचा सुळसुळाट वाढत असून, नागरिक जीव मुठीत घेऊन प्रवास करण्यास मजबूर झाले आहेत. या वाहनांची कोणतीही अधिकृत नोंदणी नसूनही ते निर्धास्तपणे रस्त्यावर धावत आहेत. परिणामी, अपघातांचे प्रमाण वाढले असून अनेक प्रवाशांना गंभीर दुखापती होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत.

गेल्या काही महिन्यांत या भागात खाजगी भंगार वाहनांच्या अपघातांमुळे अनेक नागरिकांनी हात-पाय गमावले आहेत, तर काहींना आपला जीवही गमवावा लागला आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असताना, प्रशासन व वाहतूक विभाग याकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे,त्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांकडे ना वाहन परवाना आहे,ना प्रवाशांच्या सुरक्षिततेची कोणतीही खबरदारी घेतली जाते. यामुळे अपघात झाल्यास वाहनचालक पळ काढतात आणि नुकसानग्रस्त प्रवासी मदतीशिवाय तडफडत राहतात.या धोकादायक प्रवासावर आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांनी तत्काळ कारवाई करावी आणि या बेकायदेशीर वाहतूक व्यवस्थेला पूर्णतः थांबवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जर प्रशासनाने लवकरच योग्य पावले उचलली नाहीत,तर संतप्त नागरिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत आहेत.ग्रामीण भागातील प्रवाशांची सुरक्षितता अबाधित राहण्यासाठी शासनाने अधिकृत एस.टी. बससेवा वाढवावी किंवा प्रवासी वाहनांची व्यवस्थित नोंदणी करून त्यांना आवश्यक सुरक्षा नियम लागू करावेत. अन्यथा, ही समस्या अधिक गंभीर रूप धारण करू शकते.

मेहनत केली तर उद्याचे भविष्य उज्वल आहे- एपीआय अमन सिरसट

महाराणी ताराबाई विद्यालयात इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

बीड ■ प्रतिनिधी



बीड वडवणी प्रतिनिधिः महाराणी ताराबाई विद्यालयातील इयत्ता १० वी व १२ वी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एपीआय अमन सिरसट म्हणाले की,विद्यार्थी मित्रांनो आज मेहनत केली तर उद्याचे तुमचे भविष्य उज्वल आहे म्हणून आज अभ्यास करा.आयीस्ता चल जिंदगी अबी कही कर्ज चुका ना बाकी है। कुछ दर्द मिटाने बाकी है।कुछ फर्ज निभाना बाकी है। या कवितेच्या ओळीचा अर्थ आपण लक्षात घेतला तर माझ्या भाषणाचा सार्थक झालं असे समजेल तसेच बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी क्यूआर कोड बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये सुरू केलेला आहे त्याबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता-१० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शनिवार दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यालयांमध्ये संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वडवणी पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी एपीआय अमन सिरसट तर प्रमुख अतिथी म्हणून बलभीम महाविद्यालय बीड येथील उपप्राचार्य बिराजदार सर,प्रा.तुपे सर,कवडगाव येथील जय जवान विद्यालयाचे प्राचार्य सारोक्ते डी.जी. सर,वडवणी पोलीस स्टेशन येथील राऊत सर तसेच मुंजाळ सर,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,श्री.ठोंबरे सर,श्री.कुलकर्णी सर,श्री.चोले सर आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करू कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

विद्यालयातील विद्यार्थी चि.समाधान मुंडे,कु.राधिका निरडे,कु.प्रिती तुरुकझाडे यांनी आपल्या मनोगतातून शाळेतील आठवणींना उजाळा दिला तसेच मान्यवरांनी व अध्यक्ष प्राचार्य राऊत सर यांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

कर्मचारी हाच एमआयडीसीचा कणा- उद्योग मंत्री उदय सामंत

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूरः महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील कार्यरत असलेल्या कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या मुलांनाही भविष्यात आपल्या उद्योगाची पायाभरणी करता आली पाहिजे. विविध उद्योग व्यवसायांना सकारून देण्याचे कसब अंगी असलेल्या आमच्या कर्मचाऱ्यांच्या मुलांना हे बाळकडू घरूनच असल्याने ते यात कमी पडणार नाहीत. यादृष्टीने विचार करून गुणवत्ताधारक पाल्यांना आयपॅड व इतर साहित्य देऊन प्रोत्साहन देण्याची भूमिका उद्योग विभागाने घेतली असे प्रतिपादन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले.

नियोजन भवन येथील सभागृहात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील अधिकारी कर्मचारी यांच्या आठवी ते दहावीपर्यंत शिकत असलेल्या गुणवत्ताधारक पाल्यांना टॅब व शैक्षणिक आज्ञावलीच्या वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

कोणत्याही चांगल्या गोष्टीचे श्रेय जेव्हा विभाग प्रमुख म्हणून, या विभागाचे मंत्री म्हणून आम्ही घेतो तेव्हा नकळत या यशामागे या विभागातील कर्मचाऱ्यांचेही हात व मेहनत आहे, याची जाणीव उद्योग मंत्री म्हणून मी प्रत्येक वेळेस ठेवली आहे. या जाणिवेतूनच आपल्या आरोग्य विमाबाबत, आपल्याला लागणाऱ्या सेफ्टी साहित्य याचबरोबर दुचाकी वाहनासाठी पूर्वी असलेली मर्यादा वाढवून देण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

अलीकडच्या वर्षात महाराष्ट्राच्या उद्योग विभागाने महत्वपूर्ण निर्णय घेऊन यासाठी लागणारी कामे अतिशय अल्प कालावधीत पूर्ण करून दाखवले. अमरावती येथील टेक्स्टाईल पार्क साठी लागणाऱ्या जमिनीचे संपादन हे केवळ ४५ दिवसात आपल्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी करून दाखवले याचा आम्हाला अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नागपूर व अमरावती विभागातील ५१ पाल्यांना टॅब देण्यात आले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी उपेंद्र तामोरे, मुख्य राजेश झंजाड, अधीक्षक अभियंता सुनील अकुलवार, प्रादेशिक अधिकारी मनोहर पोटे व मान्यवर उपस्थित होते.

दिल्ली विधानसभा विजयाचा कंधार भाजपने केला आनंदोत्सव..!

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार : दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन केले असुन कंधार भाजपच्या वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल काल लागले असुन विधानसभेच्या ७० पैकी ४९ जागेवर भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन केले आहे. या विजयाचे भारतीय जनता पार्टी कंधार शाखेच्या वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला. शहरातील महाराणा प्रताप चौकात फटाके फोडून साखर वाटण्यात आली. या वेळी भारतीय जनता पार्टीच्या घोषणा देऊन विजय उत्सव साजरा करण्यात आले.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष गंगाप्रसाद यन्नावार, माजी जि. प .सदस्य विजय धोंडगे, वेंकट गव्हाणे, भगवान महाराज यास, माजी प.स. सदस्य उत्तम चव्हाण, माजी पं. स. सदस्य सत्यनारायण मानसपुरे, संभाजी घुगे, दत्ता करामुंगे, राजेश गंजेवार, सागर डोंग्रजकर, शरद भागानगरे,प्रवीण बनसोडे, केदार मुत्तेपवार, शैलेश बयास, अनिल मोरे, पांडुरंग वागमारे,भारत पाटिल चिखलीकर, शिवा पाटिल, निरंजन मोरे , चंद्रकांत घोरबांड, मनोहर मंगनाळे, गणेश ठाकुर,सुनिल राठोड यांची उपस्थिती होती.

१२वीच्या परिक्षेत कॉपी बहारदारा विरोधात कठोर कारवाई होणार- तहसीलदार अशोक भंडारे

केज ■ प्रतिनिधी

४ अति संविद्नशील परीक्षा केंद्रावर प्रशासनाची करडी नजर- गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडस्कर



केजः १२ विच्या परिक्षेत कॉपी बहारदारा विरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार अशोक भंडारे यांनी माध्यमाशी बोलताना दिली आहे तर ४ अति संविद्नशील परीक्षा केंद्रावर प्रशासनाची करडी नजर राहणार असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडस्कर यांनी दिली आहे.

याबाबतचे सविस्तर माहिती अशी की,आज दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ पासुन १२ वीची परिक्षा सुरु होत असुन या परिक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने कॉपी मुक्त परिक्षा पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवला आहे. विद्यार्थ्यांनी व पालकांनी कॉपी मुक्त परिक्षा पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे कॉपी बहाद्दराची गय केली जाणार नाही, कठोर कारवाई करण्यात येईल असे प्रशासनाच्या वतीने,केज तहसीलचे तहसीलदार अशोक भंडारे, पोलिस निरीक्षक वैभव पाटील केजचे गटशिक्षणाधिकारी यांनी विद्यार्थी व पालक यांना आवाहन केले आहे.

एकलव्य माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाला जनसागर लोटला; स्नेहसंमेलनात युवकांनी प्रेक्षकांची मने जिंकली

बीड ■ प्रतिनिधी



बीड वडवणी : वडवणी : रोजी वडवणी तालुक्यातील डोंगर पट्ट्यात चिखलबीड याठिकाणी शिक्षणाचा वटवृक्ष म्हणुन उभा असलेली एकलव्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ही शाळा गेल्या पंचवीस वर्षापासुन विद्यार्थी घडवण्याचे काम मोठ्या जोमाने करत आहे. याच शाळेने ग्रामीन भागात कुठेच होत नसलेला स्नेह संमेलनाचा कार्यक्रम पहिल्यांदा घेतला,अन आश्चर्य म्हणजे या कार्यक्रमाला चिखलबीड हे अख्खं गाव व पंचक्रोशीतील जनसागराने तोबा गर्दि केली.या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी विविध हिंदी मराठी गाण्यावर अप्रतीम असे डान्स करत धम्मालच उडवून दिली व उपस्थीत प्रेक्षकांची मने जिंकली.

सविस्तर वृत्त असे की वडवणी तालुक्यातील डोंगरपट्ट्यासारख्या दुर्गम भागात गेल्या पंचवीस वर्षापुर्वी एकलव्य माध्यमिक विद्यालय नावाचं शिक्षणाचे रोपटे लावले अन् पहाता पहाता हे रोपट्याचा वटवृक्ष झाला,खेड्यापाड्यात राहाणारे हजारो विध्यार्थी या शाळेमुळे शिक्षक, डॉक्टर,इंजिनिअर,वकिल, पोलिस झाले आहेत. चिखलबीड याठिकाणी शिक्षणाचा वटवृक्ष म्हणुन उभा असलेली एकलव्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ही शाळा गेल्या पंचवीस वर्षापासुन विध्यार्थी घडवण्याचे काम मोठ्या जोमाने करत आहे

या शाळेच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर विद्याथ्यार्थ्यांच्या कला गुणांन वाव मिळावा म्हणुन स्नेहसंमेलनाचा सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यात आला दि. ०७ फेब्रुवारी शुक्रवारी रोजी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते,यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध वेष भुषा परीधान करत हिंदी मराठी गाण्यावर चिमुकल्या विद्यार्थांनी धम्माल उडवून दिली. कार्यक्रमाची सुरुवात ! गणेश वंदनेने केली.

पुष्पा, लुंगी डान्स,वारी चुकायची नाही,शिवाजी महाराजांचा कीर्ति पोवाड़ा, तेरी मिठी में मरजावा, यासह शेकडो गाण्यवर अप्रतीम डान्स केला. प्रेक्षक पालकांनीही युवाकलाकारांच्या कलेला टाळ्यांच्या कडकडाटासह दाद दिली. या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेच्या संस्थापिका मा. सुशिलाताई मोराळे मॅडम यांनी केले,तर प्रमुख उपस्थिती म्हणुन चिंचवनचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे, मुख्याध्यापक घुले सर, सरपंच सौ. सागर विलास वडणे, जेष्ठ नेते कानिकराव मुंडे, मा.सरपंच विकास मुंडे, लोकमानसचे संपादक सतिशजी वाघमारे, पोलिस पाटील गुलाब वाघमारे, चेअरमन आश्रुबा वडणे, श्रीमंत(आप्पा) नेहरकर, बाबासाहेब होंडे, युवा नेते रंजित वडणे, मुस्तफा (भैया) पठाण, महादेव फरांडे, यांची कार्यक्रमासाठी उपस्थिती होती. तर कार्यक्रमासाठी परीश्रम घेणारे शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याद्यापक श्री.कानाडेसर,

आघाव सर, बोदर सर, चव्हाण एस बी, सानप सर, साखरे सर, आंधळे सर, चंदनशिव सर ,नेकनुरकर सर, लव्हाळे सर, ठोंबरे सर, यादव सर, गवारे सर, राऊत सर, तोगेमॅडम, देशमुख, चोलेसर ,नेहरकर, सह सर्व शिक्षक यांनी मेहनत घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चव्हाण डीटी, यांनी केले,तर ऊपस्थीतांचे अभार बोंद्रे सर यांनी मानले.

बक्षिसांचा वर्षाव

या शाळेच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर विद्याथ्यार्थ्यांच्या कला गुणांन वाव मिळावा म्हणुन स्नेहसंमेलनाचा सांस्कृतीक कार्यक्रम दि. ०७ फेब्रुवारी शुक्रवारी रोजी घेण्यात आला. यामध्ये विद्यार्थांच्या विविध वेष भुषा परीधान करत हिंदी मराठी गाण्यावर चिमुकल्या विद्यार्थांनी धम्माल उडवून दिली. हा कार्यक्रम पहाण्यासाठी चिखलबीड हे अख्खं गाव शाळेच्या मैदानात उपस्थित झाले होते तर विद्यार्थांच्या प्रत्येक गाण्यावर हाजारो रुपयांचे बक्षिस येत होते,संपुर्ण कार्यक्रमात एकूण पंचवीस हजार रुपये जमा झाले आहेत.

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची जिल्हा कार्यकारिणीची सहविचार सभा संपन्न

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी विमाशी कटिबध्द - माजी शिक्षक आमदार व्हि. यू. डायगव्हाणे

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा - विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ जिल्हा वर्धाची जिल्हा, तालुका व शहर पदाधिकारी, कार्यकर्ते व मार्गदर्शक यांची सहविचार सभा शनिवार दिनांक ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत माजी शिक्षक आमदार तथा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ, मुंबईचे अध्यक्ष मा. श्री. व्हि. यू. डायगव्हाणे सर यांचे निवासस्थानी व त्यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सभेला मंचावर विमाशी संघाचे मार्गदर्शक मा. श्री. व्हि. एम. देशमुख, प्रांतीय उपाध्यक्ष मा. श्री. जयप्रकाश थोटे, कार्याध्यक्ष मा. श्री. पांडूरंग भालशंकर, मार्गदर्शक मा. श्री. राजेंद्र वसु व खाजगी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा सचिव मा. श्री. सुरेशकुमार बरे उपस्थित होते. सदर सभेत रविवार दिनांक २३ मार्च २०२५ रोजी, चरडे सभागृह , कारंजा (घाडगे) जिल्हा वर्धा येथे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ जिल्हा वर्धा चे जिल्हा अधिवेशन होत आहे. त्या विषयी सभेत विस्तृत चर्चा करून जिल्हा अधिवेशन यशस्वी करण्याबाबत संपूर्ण नियोजन करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वैयक्तिक समस्यांबाबत सभेत विस्तृत चर्चा करण्यात आली. व प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे शिक्षक आमदार तथा विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह मा. श्री. सुधाकरजी अडबाले सर व मा. श्री. व्हि. यू. डायगव्हाणे सर यांचे उपस्थित मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे सोबत तक्रार निवारण सभा आयोजित करण्याचे ठरले. सदर जिल्हा नियोजन सभा ही विमाशी संघाचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. विष्णू इटनकर यांचे मार्गदर्शनात घेण्यात आली. सभेचे प्रास्ताविक विमाशी संघाचे कार्यवाह मा. श्री. महेंद्र सालंकार यांनी केले व संघटनेच्या पुढील नियोजनाचा आढावा सादर केला. यावेळी उपस्थित मा. श्री. व्हि. यू. डायगव्हाणे सर, मा. श्री. व्हि. एम. देशमुख, मा. श्री. पांडूरंग भालशंकर व मा. श्री. सुरेशकुमार बरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून संघटनेचे महत्त्व विषद केले. उपस्थित सर्वांचे आभार विमाशी संघाचे जिल्हा कोषाध्यक्ष मा. श्री. शशांक हूलके यांनी मानले. यावेळी सदर सभेला सर्वश्री मा. शशिकांत वैद्य, सुनील धवने, महेंद्र सालंकार, शशांक हूलके, प्रमोद खोडे, मंदा चौधरी, शुभांगी नवले, प्रांजली बोंडे, प्रफुल महंतारे, प्रविण भिसे, मंगेश जाचक, राजू जसुतकर, आढाव सर, दशरथ डांगोरे, ज्ञानेश्वर निमकर, निलेश राजनकर, चंद्रशेखर प्रांजळे, किशोर सांभारे, दिलीप तायवाडे, अमोल राठोड, धर्मपाल मानकर, सतीश लोखंडे, नंदकिशोर ठाकरे, अशोक घारे, प्रविण देशमुख, संतोष वरभे, नरेंद्र गलांडे, नितीन वांदीले, सुनील दुम्पलवार, रवींद्र वाघमारे, विजय पिंपळकर, विजय जिंदे, रवींद्र राठोड, चंद्रकांत ठाकरे, प्रविण भोयर, योगेश फिरंगे, शैलेंद्र बोकडे, मनोज वानखेडे, धर्मेश झाडे,

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242